**अब्राहम लिंकन**
**अॅना स्प्राउल**

अमेरिकन संघराज्याचे सोळावे अध्यक्ष अब्राहम लिंकन यांनी १ जानेवारी १८६३ या दिवशी मुक्तीच्या जाहीरनाम्यावर सही केली. त्या जाहीनाम्यामुळे सुमारे चाळीस लाख लोक गुलामगिरीच्या शापातून मुक्त होणार होते.


कापसाचे उत्पादन करणाऱ्या दक्षिणेकडील राज्यांतील गुलामांना स्वातंत्र्य देऊन अब्राहम लिंकन यांनी त्यांच्या देशातील यादवी युद्धाचे भवितव्य निश्चित करणारी एक खेळी खेळली. गुलामांना बंधमुक्त करण्याचा त्यांचा निर्णय म्हणजे अमेरिकन संघराज्याला वाचवण्यासाठी केलेली एक राजकीय कृती असली तरी त्यामुळे ह्या जाहीरनाम्याचे महत्त्व कमी होत नाही. कारण शेवटी कितीतरी वर्षांनंतर भय, अपमान आणि मानभंग निर्माण करणाऱ्या गुलामगिरीचे साम्राज्य संपले होते. मनाची पकड घेणारी ही कथा आहे. अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना त्यांच्या देशामध्ये तसेच देशाबाहेर पूर्णपणे बरोबरीने स्वीकारले जाण्यासाठी कितीतरी काळ जावा लागणार आहे. त्यासाठी अथक लढा द्यावा लागणार आहे.


परंतु या कार्यासाठी अतिशय महत्त्वाची सुरुवात १८६३ च्या त्या नव वर्षदिनी झाली.



# अब्राहम लिंकन

**गुलामगिरीच्या शापातून अमेरिकन संघराज्याची मुक्तता करणारा थोर राष्ट्राध्यक्ष**





## सोन्याची लेखणी

खिडकीजवळच्या टेबलाशी बसलेल्या त्या उंच माणसाने हात पुढे करून कागद पुढ्यात ओढला. दुसऱ्या हाताने त्याने लेखणी उचलली; सोन्याची लेखणी. कारण आता तो जी स्वाक्षरी करणार होता तिला ऐतिहासिक महत्व होते. जणू ती सुवर्णाक्षरेच होती. त्याने लेखणी हातात धरताच त्याच्याकडे पाहणाऱ्या सर्वजणांनी आपले श्वास रोखले.

इथेच बसून राष्ट्राध्यक्ष रोज अनेक कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या करत. त्यांत अनेक प्रकारची पत्रे, कायदे, दक्षिणेत अखंड चालू असलेल्या युद्धातील सैन्याला आदेश आणि या युद्धातून पळून गेलेल्या सैनिकांचे माफीहुकूम यांचा समावेश असे. सोन्याची लेखणी हातात घेतलेला तो माणूस कनवाळू होता, दुःखाची जाण असलेला होता. म्हणूनच युद्धातून पळून गेलेल्या सैनिकांना तो शक्यतो क्षमा करत असे.


पण आज, १८६३ सालच्या पहिल्या दिवशी तो ज्या कागदावर सही करणार होता, तो केवळ एका सैनिकाला क्षमा करणारा सामान्य आदेश नव्हता, तर एका संपूर्ण समाजाच्या मुक्ततेचा तो ठराव होता. पिढ्यान् पिढ्या गुलामगिरीत खितपत पडलेल्यांना प्रथमच कायदेशीर रीत्या माणूसपण मिळाल्याची ती नांदी होती.

त्या कागदावर सही झाली, की दक्षिणेतील बंडखोर शेतमालकांच्या शेतात गुलाम म्हणून राबणारे लाखो कृष्णवर्णीय मुक्त झाल्याचा तो जाहीरनामा ठरणार होता.

## सर्व गुलामांची मुक्तता....

पुढे वाकून राष्ट्राध्यक्षांनी दौतीत लेखणी बुडवली आणि बाहेर काढली - अन् ते थबकले. त्यांनी आपल्या हाताकडे निरखून पाहिले आणि त्यांच्या कपाळावर आठी उमटली. त्यांच्या हाताला कंप सुटला होता. इच्छाशक्तीच्या जोरावर त्यांनी कंपन थांबवण्याचे प्रयत्न केले. पण हात कापतच राहिला.

समोर: मुक्तीचा प्रेषित, अमेरिकन संघराज्याचा सोळावा अध्यक्ष अब्राहम लिंकन.
खाली : मुक्तीचा जाहीरनामा. दिनांक १ जानेवारी १८६३ या दिवशी लिंकनने या जाहीरनाम्यावर सही केली. दक्षिणेच्या कापूस पिकविणाऱ्या राज्यांमध्ये गुलामगिरीत जखडून ठेवण्यात आलेल्या जवळजवळ चाळीस लाख कृष्णवर्णीय अमेरिकनांना या जाहीरनाम्याने मुक्तता प्रदान केली.



छे, असे कसे चालेल ? शाईने भरलेली ती लेखणी राष्ट्राध्यक्षांनी काळजीपूर्वक खाली ठेवली आणि बोटे मोडली. त्यांची बोटे जवळजवळ बधिर झाली होती, हात दगडासारखा जड झाला होता.

अर्थात् यात आश्चर्य नव्हते-सकाळचा वेळच तसा गेला होता. युद्ध चालू असले तरी शेवटी तो नव वर्षदिन होता. सकाळच्या वेळी राष्ट्राध्यक्षांची नवीन वर्षाची पार्टी झाली. नवीन वर्षानिमित्त व्हाईट हाऊसला भेट देणाऱ्या नागरिकांचे त्यांनी स्वागत केले होते आणि त्या सगळ्यांशी हस्तांदोलन केले होते.

इतिहास घडविणाऱ्या क्षणाला सामोरे जायला काही चांगली तयारी झाली नव्हती. पुढ्यात पडलेल्या त्या कागदाने सर्वच काही बदलणार होते. राष्ट्राध्यक्षांना हे माहीत होते - कागदावरील मजकुराच्या खाली ते जे नाव लिहिणार होते त्या नावाइतकीच त्यांना या सत्याची जाणीव होती. हजारो लोक ती सही पाहणार होते. त्या कागदावरच्या सर्वांत महत्वाच्या ओळी होत्या - "मी आज्ञा देतो आणि जाहीर करतो, की निर्दिष्ट प्रांतराज्यांत किंवा त्यांच्या कुठल्याही भागात गुलामीत ठेवलेल्या सर्व व्यक्ती आजपासून व यापुढे मुक्त झाल्या आहेत...."

"अमेरिकन इतिहासात कृष्णवर्णीयांच्या मुक्तीइतकी नाट्यमय घटना दुसरी कोठलीही नाही. एक शतक लोटले तरी अजूनही तिच्या स्मृतीने हृदय उचंबळून येते. गुलामांच्या मुक्ततेबरोबरच, गुलामीवर आधारलेल्या एका अत्यंत सामर्थ्यशाली समाजाचा लष्करी पाडाव झाला. जवळजवळ चाळीस लाख गुलाम मुक्त झाले. पाश्चिमात्य जगातले गुलामीवर आधारलेले सर्व समाज एकत्र केले तरी गुलामांची संख्या एवढी झाली नसती."

"फॅमिली ॲन्ड फ्रीडम: ब्लॅक फॅमिलीज् इन द अमेरिकन सिव्हिल वॉर" यामधून.

## मुक्तीपेक्षा अधिक काहीतरी

त्या वीस-पंचवीस शब्दांनी मुक्तीपेक्षा काहीतरी अधिक व्यक्त केले होते. त्यांच्याबरोबर भीती येणार होती, विनाश येणार होता. त्या शब्दांनी गुलामांच्या मालकांच्या सुबत्तेला सुरुंग लागणार होता. हे लोक जी जीवनप्रणाली नष्ट होऊ नये म्हणून धडपडत होते, ती सबंध प्रणालीच कोलमडून पडणार होती. त्या शब्दांनी, चालू असलेले भीषण युद्ध संपायला मदत होणार होती - नव्हे त्यांच्यामुळे ते संपायलाच हवे होते आणि अशा त्या शब्दांना कायद्याचे रूप देणारा हात सही करताना कापत होता - जणू काही सही करावी की नाही अशा द्विधावस्थेत तो पडला असावा.

पण त्या व्यक्तीचा निश्चय म्हणजे दगडावरची रेघ होती. हात कापो की स्थिर राहो, आज त्याच्यावर त्या व्यक्तीच्या मनाची हुकमत चालणार होती अन् मुक्तीच्या जाहीरनाम्यावर सही होणार होती.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी सोन्याची लेखणी उचलली आणि आपल्या तिरक्या अक्षरांत काळजीपूर्वक नाव लिहिले : अब्राहम लिंकन.

"निग्रो हा माणूस असेल तर माझ्या प्राचीन धर्माची अशी शिकवण आहे, की सर्व माणसे जन्मत: समान आहेत, आणि एका माणसाला दुसऱ्याला गुलाम करण्याचा काहीही नैतिक अधिकार नाही."

ऑक्टोबर १८५४ मध्ये पेओरिया येथे अब्राहम लिंकनने केलेल्या भाषणामधून

## तीन महान कार्ये

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांच्या सबंध इतिहासात अब्राहम लिंकन हा एक अत्यंत महान राष्ट्राध्यक्ष होऊन गेला. तो एक विलक्षण माणूस होता - विनम्र आणि तरीही महत्वाकांक्षी; सहृदय आणि तरीही कणखर; कष्टाळू तरीही विलक्षण बुद्धिमान. त्याच्या मृत्युला शंभर वर्षे लोटली, पण आजही इतिहासातले बहुतेक सर्व मोठे नेते त्याच्या पुढे थिटे वाटतात.

अशा व्यक्तीचे अस्तित्व डोंगराएवढे असते. पण आणखी दोन महान कार्यांसाठी लोक त्याची आठवण काढतात. एक म्हणजे त्याने आपल्या देशाला आत्मनाशापासून वाचविले, आणि दुसरे म्हणजे गुलामगिरीची अनिष्ट प्रथा नष्ट केली.

## झोपडीतला जन्म

गुलामांना मुक्ती देणारा हा राष्ट्राध्यक्ष स्वत: अतिशय गरीब कुटुंबात जन्मला. दिनांक १२ फेब्रुवारी १८०९ या दिवशी केंटकी राज्यात नोलिन क्रीक येथे एका ओंडक्यांच्या झोपडीत त्याने या जगात प्रवेश केला. या झोपडीला एकच दरवाजा, एकच खिडकी आणि धुराडे होते. घरातील जमीन मातीची होती. झोपडीचा आकार एखाद्या टपरीइतकाच होता. लहानगा एब, त्याची दोन वर्षांची बहीण सारा आणि त्यांचे आई-वडील थॉमस आणि नॅन्सी यांचे हे घर होते. आनंदी, मनमोकळ्या स्वभावाचा थॉमस एक लहान शेतकरी होता. केंटकीतील जमीन कसून तो कशीबशी गुजराण करी.

हे लहानसे कुटुंब नोलिन क्रीकला फार काळ राहिले नाही. ते ओढ्याला लागून जरा पुढे, नॉब क्रीक या ठिकाणी गेले. अब्राहम सात वर्षांचा असताना या कुटुंबाने पुन्हा स्थलांतर केले. या वेळी ते अमेरिकेतील सर्वांत नवीन राज्य इंडियाना येथे गेले.

## ओसाड सीमेवर

केंटकीतील त्यांची जुनी घरे ओसाड प्रदेशातच होती, तर इंडियानातील लिटल पिजन क्रीक येथील त्यांचे नवे घर तर निर्जन सीमेवरच होते. कडाक्याच्या थंडीत ते तिथे आले. वसंत ऋतू येईपर्यंत घरबांधणी अशक्य होती, म्हणून बर्फाळ थंडीचे महिने त्या कुटुंबाने तीनच भिंती असलेल्या ओंडक्यांच्या टपरीत काढले. चौथ्या उघड्या बाजूला पेटवलेली भली मोठी शेकोटी काय ती थंडीचे निवारण करी.

सन १८१८ मध्ये अब्राहम नऊ वर्षांचा असताना त्याच्या कुटुंबावर एक मोठे संकट ओढवले. सरहद्दीवरच्या खडतर जीवनाने खंगलेली नॅन्सी लिंकन मरण पावली. केवळ तिशीतली असूनही तिचे दात पडले होते आणि त्वचा एखाद्या पिकलेल्या पानासारखी सुरकुतली होती.

सीमेवर राहणाऱ्या स्त्रिया घर चालविण्यात अन् औषधपाणी करण्यात कुशल असत, त्याच कुटुंबाचा खरा आधारस्तंभ असत. नॅन्सी गेल्यावर त्या झोपडीतले जीवन अधिकच अस्ताव्यस्त, ओंगळ, भकास झाले. यातून मार्ग काढणे आवश्यकच होते म्हणून थॉमसने एक वर्षाने पुन्हा लग्न केले. त्याची दुसरी पत्नी सारा बुश जॉन्सटन एक विधवा होती. सगळे तिला 'सैली' म्हणत.

ओंडक्यांच्या झोपडीतले शिक्षण : शेतकऱ्याच्या घरी जन्माला आलेल्या लिंकनचे बहुतेक सर्व बालपण शेतावर वडिलांना मदत करण्यात गेले. त्याचे शिक्षण जेमतेम वर्षभर झाले. पण पिजन क्रीक या त्याच्या खेड्याच्या पलीकडच्या जगाचे मिळेल ते ज्ञान करून घेण्याची त्याला तीव्र लालसा होती. तीव्र इच्छेच्या पायी त्याने आपल्या जवळची दोन-चार पुस्तके पुन्हा पुन्हा वाचून काढली. चित्रात दिसणारी झोपडी लिंकनचे जन्मस्थान असलेल्या झोपडीपेक्षा खूप चांगली आहे. या झोपडीतील जमीन लाकडी फळ्यांची आहे तर आधीच्या झोपडीमध्ये ती मातीची होती.





वर : न्यू सेलम गाव पिजन क्रीकपेक्षा अधिक गजबजलेले होते, तरीदेखील ती सीमेवरची एक ओबडधोबड वसाहत होती. चित्रात दाखविलेल्या लाकडी घरांमध्ये लोकर काढून साठविली जात असे.


## सॅली आणि पुस्तके

प्रेमळ अन् मनमिळावू स्वभावाच्या सॅली लिंकनची अब्राहमवर माया जडली. आपल्या सावत्र मुलाचे विचित्र वागणे ती अधिक समजून घेत असे. आनंदी असला की तो सारखा हास्यविनोद करी, चुटके सांगे, नाहीतर कधी कधी त्याच्या उलट घुम्यासारखा गप्प राही. सॅली समजूतदारपणा तर दाखवत असेच पण त्याला शिक्षण मिळावे म्हणूनही ती प्रयत्नशील राहिली.

थॉमस लिंकनला लेखन-वाचनाचे अजिबात महत्त्व वाटत नसे; ज्याला तो शेतमजूर म्हणून तयार करत होता त्या मुलाच्या बाबतीत तर निश्चितच नव्हे. सॅली स्वत: जरी निरक्षर होती तरी याबाबतीत तिचे नवऱ्याशी मतभेद होते. तिच्या प्रोत्साहनाने अब्राहमने हळूहळू बायबल वाचले. मग रॉबिन्सन् क्रूसोसारख्या महान कादंबऱ्या, अमेरिकेचा इतिहास व पहिले राष्ट्राध्यक्ष जॉर्ज वॉशिंग्टन यांचे चरित्र वाचले. एकदाच नव्हे तर त्याने पुन्हा पुन्हा त्या ग्रंथांचे वाचन केले. त्याला त्यांची एवढी गोडी लागली की शेतावर काम करतानाही तो थोडीशी सवड मिळाली की वाचनच करीत असे.

अब्राहमचे शालेय शिक्षण मात्र जेमतेमच झाले. शेतीच्या हंगामातील मधल्या काळात कधी एखादा महिना इकडे, तर कधी एखादा महिना तिकडे असे निरनिराळ्या खेड्यांतील शाळांमधून त्याचे शिक्षण जेमतेम वर्षभर झाले.

खाली : लिंकनच्या हस्ताक्षराचा उपलब्ध असा पहिला नमुना. आपल्या गणिताच्या पुस्तकात त्याने ही गमतीदार कविता एका पानाच्या तळाशी काळजीपूर्वक लिहिली होती.






## झाले एवढे पुरे

थॉमस लिंकनला वाटले की अब्राहमचे झाले तेवढे शिक्षण खूप झाले. शेवटी पिजन क्रीकमध्ये जन्म-मृत्यू अन् पीक-पाणी या गोष्टींनाच महत्त्व होते. त्यामुळे थॉमस लिंकनच्या मुलाच्या बाबतीत महत्त्व होते ते अंगमेहनतीला, शेतीवरची कंबरडे मोडणारी मेहनत, आणि कधी शेजारपाजारच्या शेतकऱ्यांनी काम दिले तर दिवसाकाठी पंचवीस सेंट कमाई करून देणारी मेहनत.

एव्हाना अब्राहमला थॉमसचा तिटकारा वाटू लागला होता. पण तो काहीच करू शकत नव्हता. त्यात तसा त्याला फायदाच होता. वयाच्या एकवीस वर्षांनंतरच त्याला आपली कमाई स्वत:जवळ ठेवता येणार होती व स्वतंत्रपणे जगता येणार होते.


सन १८३० मध्ये त्याचा एकविसावा वाढदिवस आला अन् गेला. त्या वर्षी पुन्हा एकदा थॉमसला स्थलांतर करायची लहर आली आणि ते कुटुंब इलिनॉयला गेले. नवीन घर उभारणे म्हणजे पिजन क्रीकमधले जुने घर उभारण्यासारखेच होते. आणखी बर्फ, साफ करायला आणखी जमीन आणि पाडायला आणखी झाडे.

आता अब्राहम कंटाळला होता. १८३१ चा वसंत ऋतू आला अन् बर्फाचा मोसम गेला. त्याच्याबरोबर अब्राहमही घराबाहेर पडला.

सरहद्दीवर राहणाऱ्या लोकांना बराच वेळ झाडे तोडण्यात घालवावा लागे. चित्रात लिंकन कुंपणाच्या कठड्यासाठी ओंडके फोडीत आहे. कुऱ्हाड चालविण्याच्या कौशल्याबद्दल तो लहानपणीच प्रसिद्ध होता. सीमेवरचा मेहनती माणूस 'एब' ही त्याची प्रतिमा पुढे त्याच्या राजकीय मित्र-मंडळींनी उचलून धरली, व त्याची लोकप्रियता वाढविण्यासाठी तिचा उपयोग केला. पण स्वत: लिंकनला आपल्या दारिद्र्यमय भूतकाळाच्या आठवणी नकोशा वाटत.

## जगावेगळा रांगडा गडी

घरातून बाहेर पडलेला अब्राहम न्यू सेलमला पोहोचला. नदीकाठच्या त्या रांगड्या वस्तीत सरहद्दीवरचा हा गडी चांगलाच रुळला. आता तो सहा फुटाहून अधिक उंच अन् भलताच दणकट झाला होता. न्यू सेलममधल्या सर्वांत मोठ्या धटिंगणाशी दोन हात करून अन् त्याला नमवून अब्राहमने टग्यांच्या टोळीचे नेतृत्व मिळविले होते. दिवसा दुकानात कामावर असताना तो अश्लील गोष्टींची इतकी बरसात करीत असे.



एक गोष्ट मात्र विस्मयजनक होती. तो दारू पीत नसे. शिवाय न्यू सेलमना रांगडा धटिंगण म्हणून त्याची जी प्रतिमा होती तिच्याशी विसंगत इतरही काही गोष्टी होत्या. गावात सुशिक्षित लोक फारच थोडे होते. एक डॉक्टर, एक शाळामास्तर आणि खानावळ चालवणारा जेम्स रटलेज. अब्राहमला यांच्याबद्दल आदर वाटे आणि शिवाय तो रटलेजची मुलगी ॲन हिच्या प्रेमातही पडलेला होता. तो गावातल्या वक्तृत्व मंडळाचा सभासद झाला.

मंडळाच्या इतर सभासदांनी या नवीन सभासदाकडे पाहून नाके मुरडली. नंतर मात्र त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. दुकानात काम करणारा तो धटिंगण उत्कृष्ट वक्ता ठरला. लिंकनला प्रोत्साहन मिळाले आणि त्याने पूर्वी लिटल पिजन क्रीकमध्ये सुरू केले तसे स्वयंशिक्षण पुन्हा चालू केले. तो गणित शिकला, आपल्या इंग्रजी

> ''मला वाटते एखाद्या डोक्यात शिक्षणाचे खूळ आहे. मी त्याला समजावण्याचा प्रयत्न केला, पण हे त्याचे खूळ जाणार नाही.''
>
> थॉमस लिंकनने आपल्या मुलाचे केलेले वर्णन.

> 'एक खेडवळ वकील.'
>
> एका राजकीय टीकाकाराने केलेले लिंकनचे वर्णन.


भाषेच्या व्याकरणाचे बारकावेही त्याने मेहनतपूर्वक आत्मसात केले आणि मग तेविसाव्या वर्षी तो राजकारणात शिरला.

## राजकारण आणि कायदा

न्यू सेलमच्या त्या दुकानात नदीवरच्या माल-वाहतुकीचा विषय नसेल किंवा लिंकनच्या चटकदार गोष्टींवर खो-खो हसायचे नसेल तेव्हा राजकारण हाच सर्वांचा गप्पांचा विषय असे. त्या गप्पा ऐकून दुकानात काम करणाऱ्या अब्राहमचे विचारचक्र सुरू झाले. रानमाळावर असलेल्या आपल्या बापाच्या शेतावरचे काबाडकष्ट त्याने चुकविले होते खरे, पण न्यू सेलममधील आयुष्यापेक्षा त्याला बरेच पुढे जायचे होते. याबाबतीत राजकारणाची मदत होऊ शकेल का? आणि ते शक्य वाटत होते. राजकारणात शिरलेले लोक झपाट्याने पुढे जात असल्यासारखे त्याला वाटत होते.

आणि म्हणूनच अब्राहम लिंकन १८३२ साली इलिनॉय राज्य विधानसभेच्या निवडणुकीसाठी उभा राहिला. तो जिंकला नाही, पण त्या अनुभवाने त्याची तृष्णा अधिकच वाढली. १८३४ साली त्याने पुन्हा प्रयत्न केला. अन् यावेळी त्याचे नशीब उघडले. इलिनॉय विधानसभेचे त्या वर्षीचे हिवाळी अधिवेशन भरले तेव्हा तिच्या सभासदांत एक खप्पड, अजागळ, उंच माणूस होता. त्याची नजर मात्र भविष्यावर रोखलेली होती. आता त्याने आपल्या महत्त्वाकांक्षांच्या यादीत आणखी एक भर घातली - त्याने वकील व्हायचे ठरविले.

वकील झाल्यावर लिंकनचे स्प्रिंगफिल्ड शहरात थाटलेले पहिले ऑफिस: 'नंबर ४, हॉफमन्स रो, वरचा मजला' टॉम ग्रुल्फेच्या फर्निचरच्या दुकानाच्या वर असलेल्या या खोलीत एक खुर्ची, एक बाक, एक पलंग आणि कायद्याच्या पुस्तकांचे एक कपाट याखेरीज फारसे सामान नव्हते.



वकील! इंडियानाच्या खेड्यातील गावंढळ भाषा बोलणाऱ्या त्या सरहद्दीवरच्या माणसाच्या बाबतीत ही अगदी असाधारण गोष्ट होती. पण इंडियानामध्येच त्याला कायद्याची प्रथम भुरळ पडली होती. इंडियाना सोडण्यापूर्वी थोडे दिवस आधी तेथील न्यायालये आणि कायद्याचे क्षेत्र यांत घडणाऱ्या नाट्यमय घटनांचा त्याला शोध लागला होता. भारावून जाऊन त्याने अमेरिकेची राज्यघटना काळजीपूर्वक वाचली आणि राज्यकारभार हाकण्यासाठी असणाऱ्या शासकीय नियमांचा अभ्यास केला होता.

## जन्मतः समान

त्याने स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याचा नीट अभ्यास केला. सन १७७६ साली ब्रिटिश साम्राज्याचे जोखड झुगारून देताना देशाच्या घटनाकारांनी इंग्लंडच्या तिसऱ्या जॉर्ज राजाला पाठविलेल्या त्या उत्कृष्ट निवेदनात म्हटले होते - ''आमच्या मते सर्व माणसे जन्मतः समान असतात हे एक स्वयंसिद्ध सत्य आहे आणि विधात्याने त्यांना काही हिरावून न घेता येण्याजोगे हक्क दिले आहेत. या हक्कांमध्ये जीवन, स्वातंत्र्य आणि सुखाचा शोध यांचा समावेश आहे...'' हे शब्द तो तरुण आयुष्यात कधीही विसरणार नव्हता.



आता तर १८३० च्या दशकामध्ये लिंकन स्वतः कायदे घडविणारा झाला. त्याने आपले स्वयंशिक्षण पुढे नेण्याचे ठरविले. त्यासाठी कायद्याची जेवढी पुस्तके आणता येतील तेवढी पुस्तके उसनी आणून त्याने मन लावून अभ्यास चालू केला. तीन वर्षांनी मार्च १८३७ मध्ये त्याने वकिलीची पदवी संपादन केली. पुढच्याच महिन्यात, एप्रिलमध्ये त्याने न्यू सेलमला रामराम ठोकला आणि आपले नशीब आजमावण्यासाठी तो राज्याची राजधानी स्प्रिंगफिल्ड येथे गेला.

## नशीब उघडले - अन् प्रेमात पडला

एका उसन्या घेतलेल्या घोड्यावर बसून सामान खोगिराला अडकवलेल्या पिशव्यांत, अन् पाय घोड्याच्या खुरांपर्यंत पोचलेले, अशा अवस्थेत लिंकन स्प्रिंगफिल्डला पोहोचला. आता त्याच्याजवळ काम आणि एक ऑफिसही होते. पण रहायला जागा मात्र नव्हती आणि खिशात सात डॉलर्सशिवाय अधिक पैसेही नव्हते. एखादा बिछाना विकत घ्यायलाही तेवढे पैसे पुरेसे नव्हते.

पण सुरुवातीपासून नशिबाने अब्राहमला साथ दिली. ज्या दुकानदाराकडून त्याने बिछाना विकत घेण्याचा प्रयत्न केला त्याला हा उंच, अबोल वाटणारा ग्राहक आवडला. त्याने लिंकनला दुकानाच्या वर रहायला विनामूल्य जागा दिली. लिंकनने बिऱ्हाड केले आणि लवकरच बुद्धिमत्ता व वक्तृत्वाच्या बळावर एक उत्कृष्ट वकील म्हणून नाव कमावले.



१८६१ मधील व्हाईट हाऊस येथे काढलेले मेरी टॉडचे छायाचित्र : एका श्रीमंत दाक्षिणात्य बँकरच्या या फॅशनेबल मुलीचा व अब्राहम लिंकनचा विवाह ४ नोव्हेंबर १८४२ रोजी झाला.

स्त्रियांच्या सान्निध्यात लिंकनला फार संकोच वाटत असे, पण सामाजिक जीवनात त्याची प्रगती होत होती. न्यू सेलमपेक्षा स्प्रिंगफिल्ड खूपच आधुनिक व सुधारलेले होते. एक व्यावसायिक माणूस या नात्याने लिंकनचे शहरातल्या उच्चभ्रू कुटुंबांशी संबंध प्रस्थापित झाले, ओळखी झाल्या. आणि १८३९ मध्ये वयाच्या तिसाव्या वर्षी तो गावातील एका अत्यंत चुणचुणीत आणि श्रीमंत मुलीच्या प्रेमात पडला.

## मेरी ॲन टॉड

लिंकनप्रमाणेच मेरी ॲन टॉडला सत्ता आणि राजकारण या दोन गोष्टींचे आकर्षण होते. पण तेवढी एक गोष्ट सोडली तर ती आणि तिचा हा उंच प्रियकर या दोघांत जमीन अस्मानाचे अंतर होते. ती बांध्याने लहानशी, बोलण्यात चतुर आणि राहणीत फॅशनेबल होती. लाजाळूपणा तिच्या गावीही नव्हता. तिचे कुटुंब केंटकीत प्रतिष्ठित गणले जात असे. ते इतके श्रीमंत होते, की घरातल्या प्रत्येक माणसाच्या तैनातीला कृष्णवर्णीय गुलाम होते.

लिंकनचे वडीलदेखील केंटकीचे होते पण शेतकामासाठी गुलाम बाळगणे तर दूरच, त्यांनी स्वतःच सगळे आयुष्य शेतामध्ये

राज्यात पाळविले होते. केंटकीनिवासी असूनही ते वेगळे होते. त्यांना गुलामगिरीची प्रथा पसंत नव्हती. त्यांच्या मुलांचेही तेच मत होते. इलिनॉयच्या विधानसभेत त्यांच्या मुलाने गुलाम बाळगण्याला विरोधही केला होता.

## भूतकाळाकडे पाठ

टॉड मंडळींना लिंकन आणि त्याचे गरीब घराणे या दोन्ही गोष्टी आवडत नव्हत्या. पण सगळ्या अडचणींवर मात करून आणि सगळा विरोध सोसून अब्राहमने आणि त्याच्या मॉलीने आपले प्रेम टिकविले आणि ४ नोव्हेंबर १८४२ रोजी मेरीच्या बहिणीच्या स्प्रिंगफिल्डमधील आलिशान घरात त्यांचा विवाह झाला.

मेरीच्या बहिणीला त्यांच्या लग्नाचा पत्ता त्याच दिवशी लागला आणि लिंकनच्या कुटुंबीयांबद्दल सांगायचे म्हणजे त्यांना कित्येक महिने कोणी कळविलेच नाही. खरे म्हणजे आपल्या दरिद्री भूतकाळाची लिंकनला अत्यंत लाज वाटत असे. तो विसरण्यासाठी त्याने कित्येक वर्षे आटोकाट प्रयत्न केले. नवदांपत्याचे पहिले घर म्हणजे थाटामाटाचे मुळीच नव्हते. स्प्रिंगफिल्डमधील एका खाणावळीच्या वरच्या मजल्यावरील खोली हे त्यांचे सुरुवातीचे घर होते. प्रगतिपथावरील या तरुण वकिलाने हालाखीचे दिवस लवकरच मागे टाकले. १८४७ च्या दशकाच्या अखेर तो आपल्या वाढत्या संसारासह स्वतःच्या घरात राहायला गेला. हे नवीन घर सुबक, लाकडी होते, त्याला झडपा होत्या आणि त्याच्या गच्चीला नाजूक नक्षीकाम केलेला लोखंडी कठडा होता.

आतापर्यंत त्याला राजकारणात मिळालेल्या यशाचे ते घर म्हणजे एक प्रतीकच होते. सन १८४६ मध्ये त्याच्या मतदारसंघातील दोन तृतीयांश मते मिळवून तो अमेरिकेच्या काँग्रेसमध्ये प्रतिनिधी म्हणून निवडून आला.

*यशस्वितेचा पुरावा : १८४४ मध्ये लिंकनने स्प्रिंगफिल्डमध्ये हे घर विकत घेतले. आता तो एक सधन वकील झाला होता. समाजातल्या इतर प्रतिष्ठित मंडळींप्रमाणेच लिंकन कुटुंबाच्या घरीही घरकामासाठी, मुलांकडे लक्ष देण्यासाठी आणि कोणी भेटायला आले तर दरवाजा उघडण्यासाठी नोकर होते. पण एकेकाळी सरहद्दीवरच्या ओसाड जगात राहिलेल्या लिंकनला पूर्वीच्या रीतिरिवाजांची आठवण राहात असे. मोलकरणीच्या आधीच तो पुढे होऊन दरवाजा उघडीत असे.*



## लिंकनच्या वेळची अमेरिका

आज अमेरिकेचा विस्तार पूर्वेला अटलांटिक महासागरापासून पश्चिमेला पॅसिफिकपर्यंत पसरला आहे. सुमारे २३ कोटी ८० लक्ष लोकसंख्या असणारा हा जगातील चौथा मोठा देश आहे.

अब्राहम लिंकनच्या काळी परिस्थिती भिन्न होती. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी लिंकनचा जन्म झाला. त्याच्या काहीसे आधी - अमेरिकेची लोकसंख्या केवळ पन्नास लाख होती. शिवाय देशाचा विस्तारही सबंध खंडभर पसरला नव्हता. ज्या लोकांनी ब्रिटिश राज्यकर्त्यांविरुद्ध १७७० च्या दशकामध्ये बंड उभारून स्वतःचे राष्ट्र उभे केले होते ते सर्व पूर्वेला युरोपियनांनी स्थापन केलेल्या तेरा वसाहतींत राहत होते.



हळूहळू अमेरिकेची वाढती लोकसंख्या त्या तेरा संस्थापक राज्यांच्या बाहेर सीमेवरच्या प्रदेशात पश्चिमेला पसरत गेली. जसजशी पुरेशा लोकसंख्येची एक एक स्थिर वसाहत झाली तसतशी तिला राज्य म्हणून मान्यता मिळाली. या पश्चिम दिग्विजयात लिंकन कुटुंबाचाही चांगला हातभार होता. व्हर्जिनियातील आपल्या मूळ घरातून बाहेर पडून त्यांनी आपले नशीब आजमावण्यासाठी केंटकीच्या 'भीषण व रक्तबंबाळ' भूमीवर पाऊल टाकले होते. या प्रदेशातील मूळ रहिवाशांनी (रेड इंडियन) आपल्या भूमीचे नेटाने रक्षण केले. या संघर्षात अब्राहमचे आजोबा अपयशी ठरले. रेड इंडियनांच्या हातून त्यांना मरण आले.

## उत्तर आणि दक्षिण

वसाहती म्हणूनही त्या तेरा राज्यांच्या वैशिष्ट्यात खूप तफावत होती आणि अमेरिकेची सीमा जसजशी पश्चिमेकडे ढकलली गेली तसतसा हा फरकही तिच्याबरोबर पसरत गेला. या फरकाची मुख्य विभाजन रेषा उत्तरेच्या व दक्षिणेच्या राज्यांमध्ये होती.

दक्षिणेची जमीन सुपीक होती व हवामान उबदार आणि आर्द्र होते. त्यामुळे या प्रदेशात प्लॅन्टेशन (मळे) या नावानी ओळखली जाणारी मोठी शेते होती. दक्षिणेतील लोकांच्या दृष्टीने इंग्लंडमध्ये शहराबाहेर राहणाऱ्या खानदानी मंडळींची जीवनसरणी आदर्श होती. यामध्ये रेखीव, सुसंस्कृत, समाजशील आणि ज्यामध्ये घोडेस्वारीसारख्या मैदानी शौकापासून वाचन, संगीतासारख्या बैठ्या छंदांपर्यंत सर्व आवडींसाठी भरपूर वेळ असेल अशा वर्तनाचा अंतर्भाव होता.

उत्तरेच्या मंडळींचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा होता. ते गंभीर वृत्तीचे होते. कष्ट, शिक्षण, लोकशाही व समता यांवर त्यांचा विश्वास होता. १७७० च्या दशकामध्ये उठाव झाला तेव्हा मॅसॅच्युसेटस् ही उत्तरेची वसाहत ब्रिटनच्या विरोधात आघाडीला होती.

*दक्षिणेची संपत्ती : दूरवर क्षितिजापर्यंत पसरलेली कापसाची बोंडे. खांद्याला बांधलेल्या पिशवीत एक एक बोंड खुडून टाकता येत असे. चित्रात काळे गुलाम बोंडे खुडीत आहेत. त्यांना दिवसाकाठी किमान सव्वा तीनशे किलो बोंडे खुडावी लागत.*



## बाजारपेठा, यंत्रे आणि कापूस

एकदा स्वातंत्र्य मिळाल्यावर या नवीन देशाची पहिली गरज पैसे कमाविण्यासाठी युरोपला निर्यात करता येण्याजोग्या मालाची होती आणि लवकरच त्यांना तसे काही सापडले, कापूस. कापसाचे झाड दमट, उबदार हवेत चांगले वाढते. अमेरिकेत उत्तरेतल्या राज्यांची थंड आणि कोरडी हवा त्यांना मानवणारी नव्हती, पण दक्षिणेच्या मळ्यांतून कापूस तणासारखा उगवत असे आणि अटलांटिक महासागराच्या पलीकडे वेगाने वाढणारी लोकवस्ती, या 'तणा'पासून तयार होणारे स्वस्त अन् टिकाऊ कापड विकत घ्यायला आतुर होती.




*दक्षिणेच्या राज्यात कापूस हे काही एकच पीक नव्हते. चित्रात लुइझियाना राज्यात एका उसाच्या मळ्यात काळे गुलाम काम करीत आहेत. हा फोटो काढण्यात आला त्यावेळी (१८६० साली) दक्षिणेत ३१ लाख ५३ हजार काळे गुलाम होते. ही संख्या एकूण लोकसंख्येच्या एक-तृतीयांश होती. पदरी बरेच गुलाम असणे ही गोऱ्या दक्षिणवासीयांच्या बाबतीत ऐश्वर्याची व सत्तेची खूण होती. एक-चतुर्थांश गोऱ्यांकडे फार तर एखादा गुलाम असे, आणि बहुतेकांकडे विसाहून कमी गुलाम असत. मळेकऱ्यांना माहीत होते की खरोखरीच श्रीमंत व्हायचे असेल तर निदान तीस गुलाम मजूर म्हणून पदरी असणे आवश्यक होते.*

युरोपात बाजारपेठा होत्या. तेथे साधनेही होती. नवीन शोध लागलेली यंत्रे सगळीकडे उभारल्या जाणाऱ्या कारखान्यांतून धडधडत होती. खरे म्हणजे युरोपातही औद्योगिक क्रांतीची एक प्रचंड उलथापालथ चालली होती.

अमेरिकेत दक्षिणेतील राज्यांनी ही संधी चटकन हेरली. मागे त्यांनी तंबाखू आणि तांदूळ यांचे पीक काढून पैसे कमावले होते. आता १७९० च्या दशकाच्या मध्यावर त्यांनी आपला मोहरा कापसाच्या लागवडीकडे वळवला. व्यापाराला तेजी आली, पैशाचा ओघ दक्षिणेप्रमाणे उत्तरेच्या राज्यातही वाहू लागला. उत्तर भागदेखील औद्योगिकदृष्ट्या प्रगत आणि सधन होऊ लागला होता. सगळीकडे कारखाने, बँका आणि उद्योगधंदे उभे राहत होते. कारखान्यांत सुती कापड, तसेच ते तयार करण्यासाठी लागणारी यंत्रसामग्री तयार होत होती. बँका दक्षिणेच्या मळेकऱ्यांना पैसे उसने देत. व्यापारी मंडळी दक्षिण प्रदेश आणि त्यांची प्रचंड परदेशी बाजारपेठ यांच्यामधला व्यापार उदीम सांभाळीत. दक्षिणेच्या 'कापूसप्रधान राज्यात' सर्वांना सुबत्ता मिळाली.

सर्वांना म्हणजे जे स्वतंत्र होते त्यांना.





## विकलेले गुलाम

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांच्या संस्थापकांनी 'सर्व माणसे समान आहेत' या तत्त्वाशी आपल्या राष्ट्राची बांधीलकी मानली होती. पण लिंकन काँग्रेसचा सभासद झाला तोपर्यंत त्या देशातील तीस लाख लोकांना अगदी कायदेशीर रीत्या जनावरासारखे वागविण्यात येत होते.

ही जनावरे म्हणजे काळे गुलाम होय. *नव्या जगात* आफ्रिकन आणि त्यांचे वंशज गुलाम म्हणून विकले गेले होते.

जिवंत माणसांचा हा अटलांटिक पलीकडचा व्यापार 'कापूसप्रधान राज्या'पेक्षाही जुना होता, अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांपेक्षा देखील जुना होता. तेरा वसाहतींमध्ये तो १७ व्या शतकाच्या प्रारंभापासून चालू होता. दोनशे वर्षे गुलामांचे व्यापारी आफ्रिकन लोकांना त्यांच्या घरांतून व कुटुंबांपासून तोडून नेत होते आणि वर्णन करता येणार नाही अशा नरकात ढकलत होते.

हा नरकवास वर्णन करणे कठीण होते. त्याहून तो सहन करायला अनेक पटींनी कठीण होता. आफ्रिकेच्या किनाऱ्यावर गुलामांच्या व्यापारपेठा होत्या, तेथून लाखो लोक पश्चिमेला

*व्हर्जिनिया राज्यातील गुलामांचा लिलाव : लिलाव करणाऱ्याच्या बाजूला उभ्या असलेल्या तरुण निग्रो कुटुंबाचे खाली थांबलेली गिऱ्हाइके निरीक्षण करीत आहेत. मुलाची विक्री आईबरोबरच होईल. पण वडील दुसऱ्याला विकले जाऊन कुटुंबाची कायमची ताटातूट होण्याची शक्यता आहे. लिलावाचे दालन म्हणजे अन्य गोऱ्या बघ्यांच्या दृष्टीने एक क्लब होता. डोळ्यासमोर घडणाऱ्या मानवी शोकान्तिकेचा त्यांच्या मनाला स्पर्श होत नव्हता. गप्पा मारण्यात किंवा वर्तमानपत्र वाचण्यात वेळ घालविण्यासाठी ते त्या ठिकाणी येत.*



*गुलाम विकण्याची आणखी एक पद्धत : व्हर्जिनियातील गुलामांचा बाजार. गुलाम स्त्रियांना घातलेले स्वच्छ कपडे म्हणजे गिऱ्हाइके मिळविण्यासाठी वापरलेले तंत्र होते. गुलाम जितके नीटनेटके दिसतील तितकी त्यांची चांगली किंमत येई. ते बारीक असतील तर विकून टाकण्यापूर्वी त्यांना मुद्दाम खायला घालून धष्टपुष्ट करण्यात येई.*

पाठवण्यासाठी लाकडी गलबतात ठासून भरून पाठवले जात असत. त्यांतील असंख्यजण प्रवासातच मरत. या दुर्दैवी जीवांनी एकदा का त्यांच्यासाठी तयार केलेल्या दुर्गंधमय व श्वास कोंडेल अशा पिंजऱ्यात पाऊल टाकले की तेथूनच त्यांच्या यमयातना सुरू होत.




गुलाम जर पुरुष असेल तर नंतर तीन महिन्यांनी तो अमेरिकेला पोहोचेपर्यंत, ते त्याचे खुल्या आकाशाचे शेवटचे दर्शन असे, तो मोकळ्या हवेचा शेवटचा श्वास असे, अर्थात ही तो अमेरिकेला पोहोचू शकला तर ची गोष्ट होती.

प्रत्येक तरुण गुलामाला ७५ सेंटीमीटर उंच, ३८ सेंटीमीटर रुंद आणि २०० सेंटीमीटरपेक्षा कमी लांब एवढ्या जागेत कोंबण्यात येत असे. लहान मुलांना ह्याच्यापेक्षा खूपच कमी जागा मिळे. स्त्रियांना व मुलांना साधारणपणे दिवसा डेकवर जाण्याची परवानगी मिळे, पण पुरुषांना एकदा शवपेटीपेक्षा लहान अशा जागेत कोंडले की त्यांना तेथेच रहावे लागे. तेथेच ते खात, झोपत, मलमूत्र विसर्जन करीत, उलट्या करीत, असह्य वेदनेने तळमळत, तापाने फणफणत, वेडे होत आणि देवाची कृपा झाली तर मरत.

स्त्री पुरुष दोघेही मरणासाठी तळमळत. संधी मिळाली की समुद्रात आनंदाने उडी टाकून ते मृत्यूला कवटाळीत असत. पण बहुतेकजणांना दुर्गंधमय अंधारात साखळीने जखडलेल्या अवस्थेत मरण येत असे. मरणाबरोबरच त्या जागेत प्रसंगी एखाद्याचे नवजीवनही सुरू व्हायचे. जहाजाच्या डॉक्टरला एकदा एक गुलाम मूल जन्माला आलेले दिसले. त्याची आई त्या वेळी एका प्रेताशी साखळीने जखडलेली होती. दारूच्या नशेमध्ये तर्र झालेला मुकादम ते प्रेत हलवायला विसरला होता.

गुलामांच्या जहाजाच्या कप्तानाला, अमेरिकेच्या वाटेवर आपल्या 'मालापैकी' एक-अष्टमांश माल तरी नष्ट होणार या गोष्टीची पूर्ण कल्पना असे. पण हा अंदाज पुष्कळवेळा चुकायचा. कधी जहाजे *नव्या जगात* मूळ वजनाच्या केवळ दोन-तृतीयांश माल घेऊन पोहोचायची, तर कधी फक्त निम्माच माल किंवा त्याहूनही कमी माल घेऊन येत.

जे मरत किंवा वेडे होत त्यांची इतर निरुपयोगी मालाप्रमाणेच



*डावीकडे : आफ्रिकेतून अमेरिकेला आणताना गुलामांना जहाजात असे कोंबण्यात येई. असे दृश्य पाहिलेल्या एका डॉक्टरला धक्काच बसला. गुलाम श्वासासाठी कसे धडपडत होते याची त्याने नमूद केलेली आठवण अशी, "प्रयोगादाखल दूषित हवेमध्ये गुदमरायला सोडलेल्या जनावरांसारखी गुलामांची प्राणांतिक धडपड चालली होती." पुष्कळ जहाजांवर यापेक्षा अधिक दाटीवाटीने गुलामांना भरण्यात येई.*

वासलात लावण्यात येत असे. म्हणजे खलाशी त्यांना समुद्रात फेकून देत असत. सबंध अटलांटिकभर शार्क मासे गुलामांच्या जहाजांच्या मागे जात.

अमेरिकन व ब्रिटिश व्यापारी दोघेही गुलामगिरीच्या या अमानुष व्यापारावर गबर झाले होते. मग एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला या व्यापारासाठी ब्रिटिश जहाजे वापरण्याची मनाई करणारा कायदा करण्यात ब्रिटिश सुधारकांना यश मिळाले. अमेरिकेने ब्रिटिशांचे अनुकरण केले. पण या बंदीमुळे गुलामांच्या व्यापाऱ्यांच्या नफ्यात घट यायच्याऐवजी तो अधिकच वाढला. कारण आता कापसामुळे सगळी परिस्थिती पालटली होती.

काळ्या गुलामांशिवाय कापसाचे पीकच काय पण दक्षिणेच्या मळेकऱ्यांची सुबत्ता, ब्रिटन व इतर जगाबरोबर जोरात चालणारा व्यापार शक्य नव्हता. पीक, सुबत्ता आणि व्यापार या सर्व गोष्टी एका गोष्टीवर अवलंबून होत्या, पेरणीपासून कापसाची बोंडे खुडण्यापर्यंत न संपणारे गुलामांचे काबाडकष्ट. 'कापूस राजा'चे हे बळी याउपर परदेशातून आणायचे नाहीत, असे कायदा म्हणत होता. पण गुलामांच्या व्यापाऱ्यांचे त्यामुळे काहीच बिघडत नव्हते. ते कायद्याला हसले आणि आपल्या मालाला आता जास्त किंमत येणार म्हणून खूश झाले. लिंकन काँग्रेसचा सभासद झाला तोपर्यंत निरोगी गुलामांची किंमत माणशी अडीच हजार डॉलर झाली होती. एक जहाज आले की गुलामांचे व्यापारी लक्षाधीश होत असत.


हा बेकायदेशीर, रक्तलांछित आणि भयानक व्यापार चालतच राहिला-चालतच राहिला.

## घोड्यांनाही जास्त चांगली वागणूक मिळे

कापसाची बोंडे खुडायचा मोसम उन्हाळ्याच्या अखेरीपासून वर्षाच्या अखेरीपर्यंत असा प्रदीर्घ होता. गुलाम पहाटेपासून संध्याकाळपर्यंत हे काम करीत. कधी कधी जास्तच. काम केव्हा सुरू करायचे, केव्हा थांबायचे, केव्हा जेवायला थांबायचे, केव्हा पुन्हा सुरू करायचे आणि दिवस केव्हा संपवायचा हे त्यांना सांगण्यात येत असे. हे हुकूम पाळले नाहीत तर त्यांना निर्दयपणे चाबकाने फोडण्यात येत असे.

कापसाच्या मळ्यांत काम करणाऱ्या गुलामांनी त्यांच्या मालकांसाठी खूप संपत्ती निर्माण केली, पण त्यांना स्वत:ला ती दिसली नाही. त्यांना अर्थातच पगार मिळत नसे. दक्षिणेतील रहिवाशांच्या मते त्यांच्या पदरी असलेले कृष्णवर्णीय ही नोकरीवर ठेवलेली माणसे नव्हती, तर शेतावरची उपयोगी जनावरे होती आणि त्यांना जनावरांप्रमाणेच किंवा अधिक वाईट वागविण्यात येत असे.

*समोर : काही गुलामांची त्यांच्या मालकांनी मुक्तता केली होती. पण बहुतेक गुलामांच्या समोर सुटकेचे दोनच मार्ग होते. मरण किंवा पळून जाणे. पळून जाणाऱ्या गुलामांना पकडण्यासाठी मळेकरी गस्त घालणाऱ्या तुकड्या करीत. अशी एक तुकडी चित्रात दिसत आहे. एकीकडे मळेकऱ्यांच्या घोड्यांच्या पुढे पळणे शक्य नव्हते तर दुसरीकडे त्यांच्या खुनशी कुत्र्यांपासून लपणेही अत्यंत कठीण होते. एकोणिसाव्या शतकातल्या एका चित्रकाराने काढलेल्या चित्रात क्रूर जनावर मागे लागलेल्या गुलामांच्या चेहऱ्यावरील भीतीचे बोलके दृश्य दिसत आहे.*



गुलामांना जेवण बऱ्यापैकी - डुकराचे मांस आणि मका मिळे. त्याच्याशिवाय त्यांना काम कसे करता येणार? पण त्यांचे कपडे अगदी पातळ आणि झिरझिरीत असत, आणि जोडे फक्त हिवाळ्यात घालायला मिळत. घरासंबंधी म्हणाल तर घोड्यांना जास्त चांगली वागणूक होती. निदान त्यांचे तबेले कोरडे असायचे आणि त्यात गवत ठेवायला जागा असायची. बहुतेक गुलामांची घरे म्हणजे बिनखिडकीची झोपडी असायची. कच्ची जमीन आणि भिंतीच्या भोकातून वारा गुलामांचा संसार पहायचा. थोडेफार नशिबवान गुलाम अगदी हाताच्या बोटांवर मोजण्याइतके असत. त्यांच्याजवळ झोपायला, बसायला खाट आणि स्वयंपाकाला थोडीफार भांडी-कुंडी असायची. बहुतेकजण खाली जमिनीवर पसरलेल्या गवतातच झोपायचे.

## मालकांची सत्ता

आपले गुलाम सदैव आपल्याच हुकमतीत रहावेत याची त्यांचे मालक सर्वतोपरी काळजी घेत. उदाहरणार्थ, गुलामांना काहीही विकण्याची किंवा विकत घेण्याची बंदी होती. साधारणपणे स्वत:च्या मालकीची कोणतीच वस्तू त्यांना जवळ बाळगता येत नव्हती. लिहा-वाचायला शिकायची त्यांना बंदी होती. त्यांना लग्न करण्याची बंदी होती, कोर्टात साक्ष देता येत नव्हती, आणि स्वत:चे रक्षण करण्यासाठी गोऱ्या माणसावर ते हात उगारू शकत नव्हते. सर्वांत मोठी गोष्ट म्हणजे मालकाच्या परवानगीशिवाय त्याची हद्द ओलांडून ते बाहेर जाऊ शकत नव्हते. जमिनीप्रमाणेच तेही मालकाची संपत्ती होते. ते पळून गेले तर तो गुन्हा होता. त्याची कमीत कमी शिक्षा म्हणजे चाबकाचे फटके. तत्वत: मालकांना गुलामांचा जीव घेण्याची परवानगी नव्हती, पण प्रत्यक्षात कायदा अनेकदा काणाडोळा करत असे. गुलामांना मरेपर्यंत चाबकाने फोडण्यात येत असे, काठीने मारण्यात येत असे, जिवंत जाळण्यातही येत असे.

*''तुम्ही म्हणता 'अ' गोरा आहे आणि 'ब' हा काळा आहे. गोऱ्याने काळ्याला गुलाम करायचे म्हणजे हा रंगाचा प्रश्न आहे? सांभाळा, कारण हा नियम तुम्हाला लावला तर तुमच्यापेक्षा अधिक गोऱ्या माणसाचा गुलाम होण्याची पाळी तुमच्यावर येईल.''*

*आपल्या गुलामगिरी विरोधी मोहिमेत लिंकनने केलेला युक्तिवाद.*

*''तुम्ही फक्त रंगाच्या संदर्भात बोलत नाही आहात? गोरे लोक काळ्यांपेक्षा अधिक बुद्धिमान असतात व म्हणून त्यांना काळ्यांना गुलाम करण्याचा अधिकार आहे असे तुम्हांला म्हणायचे आहे? पुन्हा सांभाळा, कारण हा नियम तुम्हांला लावला तर तुमच्यापेक्षा अधिक बुद्धिमान माणसाचा गुलाम होण्याची पाळी तुमच्यावर येईल.''*

*आपल्या गुलामगिरी विरोधी मोहिमेत लिंकनने केलेला युक्तिवाद.*

## गुलाम कुटुंबाची दैना

गुलाम कसलेही सामान विकू किंवा विकत घेऊ शकत नव्हते, पण कुणाचे तरी सामान म्हणून ते स्वत: मात्र विकले किंवा विकत घेतले जाऊ शकत होते आणि सबंध दक्षिणेत दुकानातून आणि लिलावात दररोज त्यांची खरेदी-विक्री चाले. जणू काही ते भांडी किंवा टेबल खुर्च्याच होते. एखाद्या मळे-मालकाला पैशाची गरज भासली की तो काही गुलाम विकायचा. तो मेल्यावर त्याच्या मालमत्तेची वाटणी करताना त्याचे वारस त्याचे गुलाम विकून पैसे करत. सरावलेले जुगारी तर पैशाऐवजी गुलामांचा वापर करीत. एका पत्त्यावर किंवा फाशावर एक जिवंत माणूस डावाला लावला जाई.



लिलावात काढलेले सामान अनेकदा वेगवेगळे विकले जाई. गुलामांना खायला-प्यायला घालून धष्टपुष्ट केले आणि साफसूफ करून लिलावासाठी उभे केले की त्यांचीही हीच परिस्थिती होत असे. गुलामांना लग्न करण्याची परवानगी नव्हती, पण ते प्रेमात पडत अन् त्यांना मुलेही होत. त्यांच्या मालकाची याला हरकत नव्हती, उलट त्यांना आनंदच होई. अनेक मालकांच्या मते गुलाम स्त्रिया म्हणजे घोड्या किंवा डुकरिणीप्रमाणे होत्या, दर नऊ महिन्यांनी मालकांच्या संपत्तीत भर घालणारी ती प्रजनन यंत्रे होती. ज्या गुलाम स्त्रिया दहा मुले होऊनही जगायच्या त्यांना काहीवेळा बक्षीस म्हणून स्वातंत्र्य देण्यात येत असे.

## रोझ विल्यम्सच्या आठवणी

मुक्त केलेली 'प्रजननक्षम' गुलाम स्त्री चांगली असेल तर तिला विकले जाण्याची भीती नव्हती, पण तिच्या मुलांची गोष्ट वेगळी असे. हजारो कृष्णवर्णीय कुटुंबे, कैद्यांच्या छावणीसारख्या वातावरणात सामान्य कौटुंबिक जीवन जगण्याचा प्रयत्न करीत होती. त्यांनाही विकले न जाण्याची शाश्वती नव्हती. गुलामांनी काहीही केले आणि एकमेकांवर कितीही प्रेम केले तरी, त्यांच्या मालकाने त्यांना निरनिराळ्या गिऱ्हाइकांना विकले तर त्यांची कायमची ताटातूट होणार ही भीती त्यांना सारखी भेडसावीत असे.

या भीतीचा किती धसका असे त्याची आठवण रोझ विल्यम्स नावाच्या नव्वद वर्षांच्या कृष्णवर्णीय स्त्रीने काही काळापूर्वी सांगितली होती. लहान वयात तिने आपल्या बापाला खेचून भरलेल्या लिलावाच्या दालनात हॉकिन्स नावाच्या मळेवाल्याला विकले गेलेले पाहिले. आणखी काही बोली झाल्या अन् हॉकिन्सने तिच्या आईलाही विकत घेतले, आणि नंतर रोझची पाळी आली. तिच्या आयुष्याची दिशा ठरविणारा तो क्षण होता.

चारशे डॉलर...... चारशे वीस.... चारशे पन्नास, लिलावात काढलेल्या त्या लहानशा मुलीच्या दृष्टीने तिचे भाग्य ठरविणाऱ्या त्या बोली म्हणजे तिच्याभोवती गर्दी करणाऱ्या अन् तिच्याकडे रोखून पाहणाऱ्या गोऱ्या माणसांचे केवळ आवाज होते.


बोली वाढत गेली, वाढत गेली आणि शेवटी दोनच आवाज ऐकू येऊ लागले.

रोझ सांगते, ''माझ्या डोळ्यांतून अश्रू झरत होते, कारण मी एखाद्या निराळ्याच माणसाला विकली जाऊन माझ्या आईपासून माझी ताटातूट होणार होती. एक माणूस पाचशे डॉलरची बोली बोलला. लिलाव करणाऱ्या माणसाने विचारले, ''आणखी वरची बोली आहे का? चला, ही पाचशे डॉलरला दिली.''

पाचशे डॉलर, मोठ्या गुलामाच्या किंमतीच्या ही फक्त एक-पंचमांश होती. पण तरीही काही कमी रक्कम नव्हती. पण

*असे इतर व्यवसाय तसाच हाही एक? जॉर्जिया राज्यामधील अटलांटा शहरात एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर काढलेल्या या छायाचित्रात इतर व्यवसायांच्या जोडीला गुलामांचे दुकान दिसत आहे. दुकानदाराच्या दृष्टीने शेजारच्या तंबाखूच्या दुकानाप्रमाणेच हाही एक व्यवसाय होता. या काळात गुलामगिरी ही दक्षिणेतील राज्यांच्या जीवन-प्रणालीचे इतके अविभाज्य अंग झाली होती, की गुलामगिरीला धोका म्हणजे प्रत्यक्ष दक्षिणेलाच धोका असे समीकरण झाले होते.*







बोली बोलणारा दुसरा माणूस आणखी पंचवीस डॉलर वर जायला तयार होता.

ठण्! लिलाववाल्याचा हातोडा आपटला गेला. अविश्वासाने आणि आनंदाने थरथर कापणाऱ्या रोझला ऐकू आले की ती मळेकरी हॉकिन्सलाच विकली गेली होती. ते लहानसे कुटुंब पुन्हा सुखरूप राहिले - सध्या तरी.

## उत्तरेत मुक्ती

काही गुलामांना त्यांच्या मालकांनी जरी मुक्त केले होते तरी बहुतेकांना माहीत होते, की या भीषण जीवनातून सुटका करून घेण्याचे दोनच मार्ग त्यांच्यापुढे होते. एक म्हणजे मरण. पुष्कळदा गुलाम आत्महत्या करीत. दुसरा मार्ग म्हणजे उत्तरेला पळून जाणे! औद्योगिक प्रगती केलेल्या, लोकशाहीवादी आणि अनेक वर्षांपूर्वी जिथे गुलामगिरीवर प्रतिबंध घातला गेला त्या उत्तरेला पळून जाणे.

उत्तरेतले लोक आपल्या हद्दीत गुलामगिरी चालू देत नसले तरी याबाबतीत त्यांची मते संमिश्र होती. पुष्कळांना दक्षिणेच्या लोकांनी आपली राज्ये कशी चालवावीत हा त्यांच्या मर्जीचा प्रश्न आहे असे वाटत असे. अनेकांना दक्षिणेतील लोकांच्या सान्निध्यापेक्षा कृष्णवर्णीयांच्या सान्निध्यात अधिक अवघडल्यासारखे वाटत असे. गुलामांना मुक्त करण्याच्या कल्पनेला त्यांचा पाठिंबा होता, पण उत्तरेच्या समाजात काळ्यांनी गोऱ्यांच्या बरोबर रहावे ही कल्पना त्यांना रुचत नव्हती.

तरीदेखील उत्तरेचे काही लोक खरोखरीच गुलामगिरीच्या विरुद्ध होते आणि त्यांची संख्या वाढत होती. जगात सहानुभूतीची नवीन भावना जागृत होत होती. औद्योगिक क्रांतीच्या काळ्या बाजूची लोकांना जाणीव होऊ लागली होती. श्रीमंत लोक सोडले तर जीवन खरोखरीच किती भीषण होते हे त्यांना उमजू लागले व ते सुधारणांची मागणी करू लागले.

अमेरिकेच्या उत्तर संघराज्यात या सुधारकांपैकी अनेकजण 'निर्मूलनकारी' होते. सबंध देशात गुलामगिरीचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे असे त्यांना मनापासून वाटत असे. ख्रिस्ती धर्माची शिकवण आणि स्वातंत्र्याचा जाहीरनामा या दोन्हींत मानवी बंधुभावाची शिकवण होती, तर गुलामगिरीची प्रथा या दोन्हींच्या विरुद्ध होती. ज्या देशाच्या नावात - अमेरिकेची संयुक्त संस्थाने - एकीचा संदेश होता त्याचे या प्रथेमुळे विभाजन होत होते आणि संपत्ती निर्माण करण्याचा हा एक अत्यंत अश्लाघ्य मार्ग होता.

## दक्षिणेला धोका

दक्षिणेकडील नागरिकांनी निमूटपणे त्या सुधारणा केल्या नाहीत. त्यांची सबंध जीवनपद्धतीच गुलामगिरीच्या प्रथेवर अवलंबून होती

*दक्षिणवासीयांची जीवनपद्धती. (खाली दिसणारी) गुलामाची दरिद्री झोपडी आणि (समोर खाली) श्रीमंतांचे विलासी निवासस्थान दोन विरुद्ध टोके दाखवत आहेत. ज्यांच्याकडे शंभर किंवा त्याहून अधिक गुलाम होते अशा सुमारे एक हजार अत्यंत श्रीमंत मळेकऱ्यांकडे आपले महाल सजविण्यासाठी खूप पैसा होता. समोरच्या पानावर दिसणारी लुइझियानातील बॉलरूम ऐश्वर्याच्या बाबतीत युरोपातील अत्यंत आलिशान प्रासादांशी स्पर्धा करणारी होती.*



*करणीची किंमत : चित्रात दिसणाऱ्या गोदामाचा मालक एक प्रसिद्ध निर्मूलनकारी होता. पण गुलामगिरीचे निर्मूलन म्हणजे गोऱ्या दक्षिणवासी समाजाचेच निर्मूलन होते. म्हणून चवताळलेले गोरे आपल्या शत्रूच्या गोदामाला आग लावीत आहेत. काही निर्मूलनकारांचे अशा प्रसंगात प्राणही गेले.*



आणि त्यांना तसे करणे परवडणार नव्हते. सर्वकाही गुलामांच्या जिवावर चालले होते, नाहीतर दक्षिणेची सारी सुबत्ता एका दिवसात नष्ट होणार होती.

काळे गुलाम नसतील तर कापसाची लागवड कोण करणार? मळ्यांची निगा कोण राखणार? अन् ती किमती बोंडे कोण खुडणार? अन्नधान्य कोण उगवणार? गाड्या अन् कुंपणे कोण दुरुस्त करणार? घोड्यांना नाल कोण ठोकणार? घराची साफसफाई, स्वयंपाक, कपडे शिलाई व धुलाई, मुलांचा सांभाळ, निरोपांची देवाण-घेवाण हे सगळे कोण करणार? आणि सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे केवळ आपल्या अस्तित्वाने आपल्या मालकांकडे किती पैसा आहे हे गुलामांच्या शिवाय कोण दाखवणार?

काळ्या गुलामांशिवाय दक्षिणेकडील गोऱ्यांचे जीवन पूर्णपणे उद्ध्वस्त होणार होते आणि ही भविष्याविषयीची वरवरची कल्पना फक्त बुद्धिमंतांना भेडसावणारी नव्हती, तर अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांच्या सतत बदलणाऱ्या भूगोलामुळे निर्माण झालेली ही एक अगदी खरीखुरी भीती होती.

संघराज्यातील प्रत्येक राज्याला आपल्या इच्छेप्रमाणे जीवन व्यतीत करण्याचा अधिकार होता, आणि या अधिकारात इतर सर्व गोष्टींप्रमाणे गुलामगिरीचाही समावेश होता. या मूलभूत अधिकाराला एकच अपवाद होता व तो म्हणजे तीन-चतुर्थांश राज्यांनी एकजुटीने गुलामगिरी नष्ट करण्याची कार्यवाही केली तर बाकीच्यांना ती बंधनकारक होती.

गुलामीची प्रथा असलेल्या राज्यांची आणि मुक्त राज्यांची संख्या साधारणपणे समसमान होती, तोपर्यंत दक्षिणेला व तेथील जीवनपद्धतीला धोका नव्हता पण संख्येतील हे संतुलन बदलत गेले तर दक्षिणेला धोका निर्माण होणार होता आणि १८२५ नंतर ही संख्या सारखी बदलू लागली. प्रत्येक बदलाबरोबर संघराज्यातला संघर्ष वाढत गेला आणि शेवटी त्यातून मार्ग काढण्यासाठी युद्ध हा एकच मार्ग उरला.

## अंकांचा खेळ

सन १८२० साली 'मिसुरी कॉम्प्रमाईज' या नावाने ओळखला जाणारा कायदा झाला होता. त्या कायद्यान्वये उत्तर आणि दक्षिण दोघांना बारा-बारा राज्ये असे समसमान प्रमाण ठरविण्यात आले. या कायद्यान्वये असेही ठरले की मिसुरी नदीच्या उत्तरेला जी नवीन राज्ये निर्माण होतील त्यामध्ये गुलामगिरीला परवानगी दिली जाणार नाही.

दोन्ही पक्षांना सौदा चांगला झाला असे वाटले. दक्षिणेने अंकांचा खेळ यशस्वीपणे खेळून आपल्या जीवनप्रणालीचे रक्षण



केले होते. या उलट गुलामगिरीच्या प्रसाराला आपण कायमचा आळा घातला अशी समजूत उत्तरेच्या मंडळींनी करून घेतली.

पण कायदे करणाऱ्या मंडळींनी अनपेक्षित घटनांवर तोड कशी काढायची याची तरतूद करून ठेवली नव्हती आणि १८३० च्या दशकात एकामागोमाग एक अनपेक्षित घटना घडू लागल्या. त्यातील एक म्हणजे टेक्सन जनतेने आपल्या मेक्सिकन राज्यकर्त्यांविरुद्ध बंड पुकारले. त्यांनी स्वतःच स्वतंत्र गुलामांचे गणराज्य स्थापन केले आणि अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांमध्ये प्रवेश मिळावा म्हणून अर्ज केला.

## आता कॅलिफोर्नियाची पाळी

उत्तर व दक्षिण यांच्यामधील राजकीय समस्या आता पुढे येऊ लागल्या. टेक्सन बंडखोरांना अखेरीस संघराज्यात प्रवेश मिळाला. नंतर फ्लॉरिडाच्या गुलाम राज्याला देखील! मागोमाग उत्तरेकडच्या इतर अनेक राज्यांनाही संघराज्यात प्रवेश मिळाला. अंकांच्या खेळाला आता धरबंध राहिला नाही.

१८५० मध्ये कॅलिफोर्नियाची पाळी आली. हे राज्य 'मिसुरी कॉम्प्रमाईज' प्रमाणे ठरलेल्या सीमारेषेच्या दोन्ही बाजूंना पसरले होते. उत्तर दक्षिण यांच्यामध्ये बराच वाद झाला आणि शेवटी दोघांच्या पदरी काहीतरी येईल असा नवीन करार झाला. कॅलिफोर्निया स्वतंत्र राज्य असावे असा तोडगा काढण्यात आला. त्याचबरोबर पळून गेलेल्या गुलामांच्या बाबतीत बराच कडक कायदा करावा, म्हणजे उत्तरेला पळून गेलेल्या गुलामांना सक्तीने परत पाठवता येईल असे ठरविण्यात आले. साहजिकच गुलामगिरी नष्ट करू पाहणाऱ्या निर्मूलनकारी मंडळींना धक्का बसला व त्यांनी प्रतिकाराचा निर्धार केला. दुसरीकडे, १८५० ची तडजोड म्हणजे दक्षिणेच्या दृष्टीनेही धोक्याचा कंदील होता. गुलाम राज्यांपैकी चार राज्यांनी तर निर्वाणीच्या उपायांचाही विचार सुरू केला होता. तो म्हणजे संघराज्याने आपली जीवनपद्धती नष्ट करण्याच्या आधीच त्यातून फुटून बाहेर पडण्याचा त्यांनी विचार केला, चर्चाही केली, पण काही काळ तरी फुटून निघण्याची कल्पना बाजूलाच गेली.

## अंकल टॉम

अमेरिकन संघराज्याच्या दोन भागांत असलेला बेबनाव १८५० मध्ये अधिकच चिघळला. संपूर्ण पाश्चिमात्य जगताला हादरवून सोडणारे 'अंकल टॉम्स केबिन' हे पुस्तक १८५२ मध्ये प्रकाशित झाले. या पुस्तकात गुलामगिरीची कहाणी गुलामांच्या दृष्टिकोनातून सांगितली होती. त्या जीवनातली भीषणता, भीती, पशुता, घोर निराशा सारे काही त्यात होते. पुस्तकाच्या लाखो प्रती खपल्या.

*"गुलामगिरीची प्रथा चूक आहे असे जरी आपल्याला वाटत असले तरी जेथे ती अस्तित्वात आहे तेथे ती एकवेळ गरज म्हणून तशीच राहू देता येईल. पण आपल्या मुक्त प्रदेशात तिच्याविरुद्ध मतदान करून तिच्यावर प्रतिबंध आणण्याचा अधिकार आपल्या हाती असताना आपण तिचा प्रसार होऊ देणे कसे शक्य आहे? तशी बंदी आणणे आपले कर्तव्य आहे, असे जर आपल्याला वाटत असेल तर आपण आपले कर्तव्य निर्भयपणे आणि समर्थपणे करावे."*

*फेब्रुवारी १८६० मध्ये कूपर इन्स्टिट्यूट मध्ये अब्राहम लिंकनने केलेल्या भाषणामधून.*

*"कोठल्याही राज्याला संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याचा एकतर्फी कायदेशीर हक्क नाही."*

*लिंकनने ४ मार्च १८६१ रोजी काँग्रेसमध्ये केलेल्या उद्घाटनाच्या भाषणातून.*


त्यातील संदेश ह्रदयाला भिडला नाही अशी फारच थोडी माणसे असतील.

मुक्त राज्यात गुलामगिरीच्या विरुद्ध उठलेला आवाज आता कानठळ्या बसविणाऱ्या गर्जनेसमान झाला.

## ...आणि कॅन्सास - नेब्रास्का

सन १८५४ मध्ये अमेरिकेच्या सीमेत आणखी एक बदल झाला व त्याचबरोबर एक नवीन समरप्रसंगही उद्‌भवला. राज्य होण्यापूर्वी नव्याने वस्ती झालेल्या भागाला 'प्रदेश' म्हणून एक विशेष वैधानिक दर्जा होता. पश्चिमेला कॅन्सास आणि नेब्रास्का असे दोन नवीन प्रदेश निर्माण होत होते. तेथे गुलामगिरी चालू ठेवतील की ती मुक्त राज्ये होतील? की त्यांना स्वतंत्र निर्णय घेण्याचा तिसरा पर्याय दिला जाईल? अखेर उत्तरेच्या लोकांना संताप आणणारी गोष्ट घडली. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांनी तिसऱ्या मार्गाचा अवलंब केला. कायदेकर्त्यांनी 'मिसुरी कॉम्प्रमाईजला' कायमची मूठमाती दिली. आणि गोऱ्या मळेकऱ्यांच्या इच्छेला येईल तेथे गुलामगिरीच्या प्रसाराला मान्यता दिली.

*एका लहानशा गावात वकिली करणारा अब्राहम लिंकन एक दिवस अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष होणार होता. त्याची कीर्ती वाढत गेली तशी लोकांची त्याच्याबद्दल माहिती काढून घेण्याची उत्सुकताही वाढली. पण तो संकोची स्वभावाचा होता. त्याने एकदा स्वत:चे वर्णन पुढील शब्दांत केले - ''अंगकाठीने बारीक, सुमारे १८० पौंड वजन, काळसर चेहरा, वाढेभरडे केस आणि घारे डोळे - आणखी काही खुणा असल्याचे आठवत नाही.''*



## लिंकन आणि गुलामगिरी

मुळात उत्तरेचा कायदेकार असणाऱ्या अब्राहम लिंकनला इतरांप्रमाणेच या संघर्षात खूप स्वारस्य होते. उत्तरनिवासी अनेक सुधारणावादी मंडळींशी तो सहमत होता. गुलामगिरीचा व तिच्याशी संबंधित सर्व गोष्टींचा त्याला तिटकारा होता. समानता आणि लोकशाहीच्या उच्च तत्वांवर आधारलेले आपले प्रिय संघराज्य गुलामगिरीने दुभंगले जात असलेले त्याला पाहवत नव्हते आणि गुलामगिरीच्या तो साफ विरुद्ध होता. कापसाच्या सघन शेतीने जमिनीचा कस नष्ट होत होता. तेव्हा ही प्रथा एक दिवस आपोआप नष्ट होईल याची त्याला खात्री होती पण तिला कापसाच्या प्रदेशाच्या बाहेर पसरू दिले तर ती कधीच नष्ट होणार नव्हती.

तरीदेखील लिंकन 'मूलभूत परिवर्तनवादी' निर्मूलनकारी नव्हता. संयम हा त्याच्या स्वभावाचा अविभाज्य गुण होता आणि हा संयम कमकुवतपणा किंवा अज्ञानातून निर्माण झालेला नव्हता. लहानपणापासून प्रयत्नपूर्वक मिळविलेल्या ज्ञानावर व त्या ज्ञानाच्या बळावर कित्येक वर्षे स्वत: केलेल्या मनन-चिंतनावर आधारलेला होता. त्याच्या सावत्र आईला आठवले तसे लहानपणीही तो दयाळू होता. त्याचा तो दयाळूपणा अजून कायम होता. पण आता प्रौढत्वाबरोबर त्याला एक नवीन दिशा मिळाली होती.

लिंकनचा दयाळूपणा केवळ मनाचा नव्हता तर बुद्धीचाही होता. तो कायद्याचा मान राखीच पण त्याच्या पलीकडेही जात असे. तो व्यक्तींचा आदर करी. लोकांच्या भिन्न दृष्टिकोनांचा, भिन्न



आशा-आकांक्षांचा व त्यांच्या हक्कांचाही विचार करी. परंतु कोणी सांगेल ते निमूटपणे न ऐकता स्वत:ला योग्य वाटेल त्याप्रमाणेच स्वत:चे जीवन घडविण्याच्या स्वतंत्र मनोवृत्तीचा तो होता. त्यामुळे जुन्या गुलाम राज्यांचा, स्वत:चा कारभार स्वत:च्या इच्छेप्रमाणे करण्याचा अधिकार त्याला मान्य होता. अमेरिकन संघराज्याच्या कायद्यानेच त्यांना तो अधिकार दिला होता. स्वतंत्र देशात कायद्याची परवानगी असेल तर गुलाम राखण्याचेही लोकांना स्वातंत्र्य असावे असे त्याचे मत होते.

## परमोच्च कर्तव्य

भावनेपेक्षा बुद्धीवर आधारलेला हा दृष्टिकोन गुंतागुंतीचा होता आणि त्यात असलेल्या आंतरिक विरोधाची लिंकनलाही कल्पना होती. टेक्ससने संघराज्यात प्रवेश केला त्यावर्षी, १८४५ मध्ये एका मित्राला लिहिलेल्या पत्रात लिंकनने आपल्या भावना व्यक्त केल्या.

पत्रात त्याने लिहिले आहे, '' माझ्या मते स्वतंत्र राज्यात राहणाऱ्या आपणा सर्वांचे संघराज्य आणि स्वातंत्र्य यांमुळे (हा परस्परविरोध वाटला तरी) इतर राज्यातल्या गुलामगिरीला आपण हात लावू नये हे परमोच्च कर्तव्य आहे. उलटपक्षी माझे असेही स्पष्ट मत आहे, की गुलामगिरीच्या नैसर्गिक अंताला आपण कळत न कळत कधीही अडथळा आणू नये व अस्तंगत होणाऱ्या गुलामगिरीला नवीन जागा सापडू देऊ नये.

## तात्पुरती निवृत्ती

कॅन्सास - नेब्रास्का वादाला उधाण आले तोपर्यंत लिंकन वकिली करण्यासाठी पुन्हा एकदा स्प्रिंगफिल्डला परतला होता. कॉंग्रेसमधील त्याची कारकीर्द त्याला राष्ट्रीय राजकारणाच्या मंचावर आणू शकली नाही याची त्याला खंत होती. तो हुशार होता, महत्त्वाकांक्षी होता, कर्तबगार राजकारणी पुरुष होता आणि उत्कृष्ट वक्ता होता. पण एवढे असूनही, का कोणास ठाऊक, कॉंग्रेस सदस्य लिंकन राजकारणात यशस्वी झाला नव्हता.

कदाचित त्याची वेळ वाईट असावी. थंड डोक्याने विचार करण्याच्या व सत्याला सामोरे जाण्याच्या त्याच्या स्वभावामुळे तो नेमका अप्रिय गोष्टींना पाठिंबा देत असे. कदाचित तो दुर्दैवीच असावा. जेव्हा पुन्हा कॉंग्रेसची १८४९ साली निवडणूक झाली तेव्हा मतदारांनी त्याच्याकडे पाठ फिरवली आणि दुसऱ्यालाच निवडले. कंपाळाला हात लावून तो पुन्हा वकिलीला लागला.

पण हा सक्तीचा राजसंन्यास फार काळ टिकणार नाही याची त्याला त्या वेळी कल्पना नव्हती. दहा वर्षांच्या आत तो पुन्हा

*''या संघर्षात माझे सर्वोच्च उद्दिष्ट संघराज्याला वाचविणे हे आहे. गुलामगिरी वाचविणे किंवा नष्ट करणे हे नव्हे. गुलामांना मुक्त न करता संघराज्याला वाचविणे शक्य असेल तर तसे करायला मी तयार आहे. आणि काही गुलामांना मुक्त करून व काहींना गुलामीत ठेवून संघराज्य वाचत असेल तर त्यालाही माझी हरकत नाही.''*

*गुलामांच्या मुक्ततेचे लिंकनने सांगितलेले कारण.*

*''या कॉन्फेडरसीच्या सर्व भागांत शांती असावी आणि हे एकमेकांशी सलोख्याने वागावेत हे सर्वांत स्वागतार्ह आहे. यामध्ये आपण रिपब्लिकनांनी जो भाग घ्यायचा आहे तो घ्यायला हवा.''*

कूपर इन्स्टिट्यूटमध्ये फेब्रुवारी १८६० मध्ये केलेल्या भाषणामध्ये, अब्राहम लिंकन.

अमेरिकतला सर्वांत महत्त्वाचा माणूस म्हणून वॉशिंग्टनला येणार होता.

## एका नवीन पक्षासाठी नेते पाहिजेत

कॅन्सास-नेब्रास्का प्रकरणाने लिंकनच्या भाग्याला निर्णायक कलाटणी दिली. तोपर्यंत गुलामगिरीला विरोध करणारी उत्तरेमधील मंडळी अनेक राजकीय गटांत विखुरलेली होती. आपली एकजूट व्हायला हवी याची आता त्यांना जाणीव झाली होती आणि म्हणूनच त्यांनी रिपब्लिकन या नव्या कोऱ्या पक्षाची स्थापना केली. या पक्षाचे, गुलामगिरीला जुन्या गुलाम राज्यांपुरतीच बंदिस्त ठेवणे आणि संघर्षमय परिस्थितीत सापडलेल्या संघराज्याचे विघटन होऊ न देणे हे दोन उद्देश होते.

या नवीन पक्षाला नेत्यांची गरज होती. पण योग्य व्यक्ती मिळणे तितकेसे सोपे नव्हते. हे नेते ज्यांचा जनतेला वचक वाटेल, ज्यांचे वक्तृत्व चांगले असेल व जे जनतेला एखादी गोष्ट पटवून देऊ शकतील असे रंगेल मुत्सद्दी असायला हवे होते हे उघड आहे.

शिवाय त्या व्यक्ती आदरणीय असायला हव्या होत्या. उत्तरेतील बऱ्याचशा मंडळींच्या मतानुसार सर्वसाधारण निर्मूलनकारी, हा त्यांच्या हितासाठी काहीही बोलेल किंवा करेल असा धटिंगण होता. रिपब्लिकन लोकांना जिच्या स्वभावात समजूतदारपणा व संयम ओतप्रोत भरलेला असेल अशी व्यक्ती हवी होती. खरे तर त्यांना... अब्राहम लिंकनसारख्या माणसाचीच गरज होती.

## दुभंगलेले घर

लिंकनने १८५६ मध्ये रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला आणि लवकरच त्याने नाव काढले. पुढील काही वर्षांत ह्या रिपब्लिकन नेत्याने भाषणे, वादविवाद, निवडणुका यांच्या आधारे आपल्या राजकीय जीवनात व पक्षात मानाचे स्थान पटकाविले. आपल्याला योग्य माणूस मिळाला हे पक्षाने ओळखले, कारण तुलनेने अपरिचित असा हा माणूस सबंध देशात प्रभावी वक्ता ठरला.

डेमोक्रॅटिक पक्षाच्या स्टीफन ए. डग्लस या त्याच्या राजकीय प्रतिस्पर्ध्याविरुद्ध त्याने गुलामगिरीवर केलेला वाद ऐकायला संपूर्ण इलिनॉय राज्यातील हजारो लोक लोटले होते. डग्लसने कॅन्सास-नेब्रास्का कायदा घडवून आणला होता आणि तो देखील फर्डा वक्ता होता. अनुभवी डग्लसनेसुद्धा, प्रतिस्पर्धी तोडीस तोड असल्याचे मान्य केले.

१८५८ च्या रिपब्लिकन राज्यपरिषदेत लिंकनने केलेल्या भाषणातले स्फूर्तिदायक शब्द, दुसरे दिवशी सकाळी वर्तमानपत्रात



वाचून हजारो लोकांची मने उचंबळून आली होती. लहान मुलालाही समजेल अशा शब्दात लिंकनने प्रथम बायबलमधील अवतरण उच्चारले - ''दुभंगलेले घर उभे राहू शकत नाही.''

मग स्वत:च्या शब्दांत तो बोलू लागला, ''माझी खात्री आहे, की अर्धे गुलाम आणि अर्धे स्वतंत्र सरकार कायम टिकू शकणार नाही.

''संघराज्य बरखास्त व्हावे असे मला वाटत नाही - घर कोसळावे असे वाटत नाही - पण दुफळीचा अंत व्हावा अशी इच्छा आहे.


''गुलामगिरीचे विरोधक तिचा प्रसार रोखतील किंवा तिचे पाठिराखे तिचा एवढा पाठपुरावा करतील, की ती जुन्या, नव्या, उत्तर, दक्षिण, सर्व राज्यांत कायदेशीर होईल.''

*''माझ्या उंच केन्टकीयन पतीच्या समोर मि. डग्लस अगदीच छोटेखानी 'राक्षस' आहेत. आणि शारीरिक उंचीप्रमाणेच बुद्धिमत्तेच्या बाबतीतही माझे पती डग्लस यांच्या तुलनेत उत्तुंग आहेत.''*


मेरी लिंकन.

## राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन

दोन वर्षांनी पौर्वात्यांना लिंकनचा वेगळाच अनुभव आला. मिडवेस्टमधून आलेल्या विस्कटलेल्या केसांच्या, काहीशा किरट्या आवाजाच्या अन् खोल पाणीदार डोळ्यांच्या या उंच वकिलामुळे स्तिमित होण्याची पाळी दोन वर्षांनी पूर्वेकडील लोकांवर आली.



*निवडणूक मोहिमेनिमित्त तयार केलेले गीत गात लिंकनच्या समर्थकांचे थवे त्याच्या स्प्रिंगफिल्डमधल्या घरावरून मिरवणुकीने जात आहेत. पांढरा कोट घालून दरवाजात उभा राहिलेला लिंकन त्याच्या प्रचंड उंचीमुळे सहज ओळखता येतो.*



वाग्युद्ध : 'छोटा राक्षस' म्हणून प्रसिद्ध असलेल्या आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्याशी लिंकनचे शाब्दिक द्वंद्व. हा प्रतिस्पर्धी म्हणजे (चित्रातील उजवीकडून दुसरा) सिनेटर स्टिफन ए. डग्लस. फक्त पाच फूट उंच असणाऱ्या स्टीफनला केवळ त्याच्या आकारामुळेच नव्हे तर त्याच्या अमोघ वक्तृत्वामुळेच हे नाव पडले होते.
त्याचा भारदस्त, भरदार आवाज त्याच्या व्यक्तिमत्त्वाला उठाव आणीत असे. याउलट, लिंकनचा आवाज किनरा व थोडा कर्कश होता; पण चित्रात दिसणाऱ्या प्रचंड गर्दीच्या शेवटपर्यंत तो ऐकू जातो याने लोक भारावले जात.

न्यूयॉर्कच्या कूपर इन्स्टिट्यूटमध्ये त्याने त्यांच्या कार्यावरील रिपब्लिकनांची श्रद्धा जगजाहीर केली तेव्हा खचाखच भरलेले सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दुमदुमले.

लिंकनने आपल्या भाषणात सांगितले, ''दक्षिणेचे म्हणणे आहे, की उत्तरेने गुलामगिरीला चुकीची प्रथा म्हणणे थांबवावे. त्यांना ती बरोबर वाटते आणि आपल्याला ती चूक वाटते. हाच सगळ्या वादाचा मूळ मुद्दा आहे...आपल्याला ती चूक वाटते, मग आपण माघार घ्यायची का? आपली मते, आपल्या मनाविरुद्ध त्यांना देऊ शकू का? सत्यांत सामर्थ्य आहे अशी आपण श्रद्धा बाळगूया, आणि या श्रद्धेच्या बळावर आपल्याला जे आपले कर्तव्य वाटते ते शेवटपर्यंत करण्याचे साहस दाखवूया''. अशा शब्दांत लिंकनने आपल्या भाषणाचा समारोप केला. तेव्हा न्यूयॉर्कच्या सुसंस्कृत जनतेने उभे राहून टाळ्यांचा कडकडाट केला.

राष्ट्राध्यक्ष या सर्वोच्च पदाच्या लढतीसाठी कोणाला निवडायचे हा महत्वाचा निर्णय घेण्यासाठी १८६० च्या मे महिन्यामध्ये रिपब्लिकन पक्षाची बैठक झाली. त्यामध्ये लिंकन जिंकला. त्याच वर्षी नोव्हेंबरच्या सहा तारखेला तो पुन्हा जिंकला. उत्तरेचे एक राज्य वगळता उत्तरेकडील अन्य राज्यांची मते त्याला मिळाली.



अमेरिकन संघराज्याचा सोळावा अध्यक्ष म्हणून लिंकन निवडून आला.

तो संयमाचा, मानवतेचा, विवेकाचा आणि समजूतदारपणाचा विजय होता. पण याच विजयाने अमेरिकेला थेट युद्धाच्या खाईत लोटले.

## फुटीर दक्षिण

व्हाईट हाऊसमध्ये रिपब्लिकन! दक्षिणेच्या गुलाम राज्यांच्या दृष्टीने असे घडणे म्हणजे सर्व संपल्यागतच होते. १८५० च्या संपूर्ण दशकात त्यांनी आपले जीवित व संस्कृती अधिकाधिक धोक्यात येत चाललेली पाहिली होती आणि त्यात आता देशाचा कारभार एका रिपब्लिकन माणसाच्या हाती गेला होता.

आता एकच गोष्ट करणे प्राप्त होते - संघटनेतून बाहेर पडणे, स्वातंत्र्य पुकारणे, जोपर्यंत जीवन आणि जीविका शाबूत आहेत तेवढ्यात बाहेर पडणे. आताच्या आताच फुटायला हवे.

लिंकन वॉशिंग्टनला पोहोचायच्या आधीच दिनांक २० डिसेंबर १८६० या दिवशी दक्षिण कॅरोलिना या राज्याने आपल्या स्वातंत्र्याची घोषणा केली - आता आपण एक स्वतंत्र देश असून यापुढे अमेरिकन संघराज्याचा आपण भाग नाही आणि येथून पुढे संघराज्याच्या कायद्यांनी आपण बांधलेले नाही असे त्यांनी जाहीर केले. मार्च १८६१ मध्ये नवीन राष्ट्राध्यक्षांचा शपथविधी झाला तोपर्यंत अलाबामा, लुइझिआना, मिसिसिपी, फ्लॉरिडा, जॉर्जिया, टेक्सस ही राज्येदेखील फुटून बाहेर पडली होती, पितृभूमीपासून वेगळी झाली होती आणि त्यांनी कॉन्फेडरेट स्टेट्स् ऑफ अमेरिका हे प्रतिस्पर्धी राष्ट्र स्थापन केले. या दुसऱ्या राष्ट्रामध्ये फक्त काही पुरुष, स्त्रिया व मुलांना समानता बहाल केली होती - ते गोरे होते.


'आपसातील दुफळीचे घर'..... आपल्या नवीन पदाच्या एकाकी उच्च शिखरावरून लिंकन भयचकित होऊन या घटनांबद्दल विचार करत होता.

''आपण पुन्हा एकदा स्वातंत्र्याचा जाहीरनामा आणि त्याच्याशी सुसंगत अशी धोरणे आणि चालीरीती स्वीकारू या. उत्तर आणि दक्षिण - सर्व अमेरिकन - सर्व स्वातंत्र्यप्रेमी, आपण सगळे एक होऊ या. महान कार्याला लागू या. आपण हे केले तर आपण केवळ संघराज्य टिकवले असे होणार नसून हे संघराज्य जपण्यायोग्य असे आपण घडवले व जपले असे होणार आहे.''

ऑक्टोबर १८५४ मध्ये पियोरिया येथे लिंकनने केलेल्या भाषणामधून.

## जनतेचे, जनतेसाठी शासन

आयुष्यामध्ये इतिहासाचे पुस्तक पहिल्यांदा हाती पडले तेव्हापासून जवळजवळ संबंध आयुष्यभर संयुक्त संस्थानांच्या संकल्पनेवर लिंकनची अटळ श्रद्धा होती. गणराज्यांचा हा महान संघ राजांच्या किंवा उमरावांच्या हुकमतीत नव्हता तर सामान्य जनतेने सांभाळलेला होता याचा त्याला अभिमान होता. ही जनता ओंडक्याच्या झोपडीत शेतावरचा मुलगा म्हणून जन्मलेल्या व आता राष्ट्राध्यक्ष झालेल्या त्याच्यासारख्यांची होती.



एप्रिल १२, १८६१ - यादवी युद्धाचा प्रारंभ झाला त्या दिवशी अमेरिका कायमची बदलली. चार्ल्सटन बंदरात संघराज्याच्या ताब्यातील फोर्ट सम्टर हा किल्ला. तो शरण यावा अशी मागणी करून दक्षिणेने या यादवी युद्धातील पहिली तोफ डागली त्याचे दृश्य. त्यांची मागणी फेटाळण्यात आल्यावर त्यांनी किल्ल्यावर तोफगोळ्यांचा सतत मारा करून त्याला शरण आणले.

अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांच्या नागरिकाला सर्व काही शक्य होते. खालच्या वर्गातील जन्म, दारिद्र्य, सामान्य परिस्थिती यांपैकी कोठल्याच गोष्टींचा प्रगतीच्या मार्गात अडथळा येत नसे. कारण अमेरिकन संघराज्यात या गोष्टींना महत्त्व नव्हते. कष्ट करण्याची वृत्ती, जिद्द, उत्साह आणि चांगले विचार यांनाच महत्त्व होते. दक्षिणेत उच्च कुळात जन्म आणि चांगली परिस्थिती यांच्यावर आधारलेली सामाजिक व्यवस्था अजूनही कायम होती. ही वस्तुस्थिती असली तरी तिला जगविणारी शेतीव्यवस्था नष्ट झाली की एके दिवशी ती समाजव्यवस्थाही कोसळणार होती यात मात्र संशय नव्हता.

पण आता लिंकनच्या डोळ्यांसमोर या संकल्पनेचा विध्वंस होत होता. सामान्य जनतेचे राज्य असलेल्या या देशाचा सामान्य जनताच विनाश करत होती. म्हणजे 'जनतेसाठी शासन' ही कल्पनाच मुळात अव्यवहार्य होती की काय?

लिंकनला मात्र तसे वाटत नव्हते किंवा तसे वाटणे शक्यही नव्हते. ही कल्पना व्यवहार्य ठरलीच पाहिजे, संघराज्याला



वाचविलेच पाहिजे आणि फुटून निघालेल्या राज्यांना, जरूर पडली तर शक्तीचा वापर करून पुन्हा मार्गावर आणले पाहिजे. कारण नाहीतरी आता त्यांनी बंड पुकारलेच होते. बंडावर, त्याचा बीमोड करणे हा एकच उपाय असतो. बंडखोरांना युद्ध हवे असेल तर त्यांना युद्धच मिळेल.

१२ एप्रिल १८६१ या दिवशी दक्षिण कॅरोलिनाच्या चार्ल्सटन बंदरात संघराज्याच्या सैनिकांनी हार खाल्ली.

अमेरिकन यादवी युद्धाला तोंड फुटले होते.

*''भौगोलिक अर्थाने आपण विभक्त होऊ शकत नाही. नवरा बायकोने घटस्फोट घेतला तर ते एकमेकांपासून दूर जाऊ शकतात. पण आपल्या देशाच्या निरनिराळ्या भागांच्या बाबतीत ते शक्य नाही. एकमेकांबरोबर राहण्याखेरीज त्यांना तरणोपाय नाही.''*

*४ मार्च १८६१ रोजी लिंकनने केलेल्या उद्घाटनाच्या भाषणातून.*

## आंतरराज्यीय युद्ध

त्या वर्षी आपण आपल्या अंगावर काय ओढवून घेत आहोत याची अमेरिकन जनतेला थोडीफार जरी कल्पना आली असती तर भडक माथ्याच्या मंडळींनीही दोनदा विचार केला असता. आंतरराज्यीय युद्ध या नावानेही ओळखले जाऊ शकण्यासारखे हे युद्ध पाश्चिमात्य जगाला आतापर्यंत कधीही न झालेल्या अतिभीषण व रक्तरंजित संघर्षात बुडविणार होते. दोन्ही बाजूंनी एकमेकांचे म्हणून जे काही नुकसान केले ते वाईट होतेच, पण ते केवळ तेवढ्यापुरतेच नव्हते. हा सर्व प्रकार ज्या प्रमाणात झाला ते प्रमाणच भयंकर होते. विमाने आणि आधुनिक शस्त्रास्त्रांशिवाय लढल्या गेलेल्या युद्धाच्या मानाने पाच लाख मृत्युमुखी, पाच लाख जखमी.. हे आकडे भयानक होते.

## कोठल्या बाजूला कोठले राज्य

अखेर कॉनफेडरेटच्या बाजूला अकरा राज्ये होती. मूळच्या सात राज्यांना अरकान्सस, व्हर्जिनिया, उत्तर कॅरोलिना आणि टेनेसी ही आणखी चार येऊन मिळाली. संघराज्याच्या बाजूला पूर्वेकडून पश्चिमेपर्यंत मेनपासून कॅलिफोर्नियापर्यंत सर्व मुक्त राज्ये होती.

आश्चर्य म्हणजे डेलावेअर, मेरीलँड, केंटकी आणि मिसुरी ही गुलाम राज्येही या बाजूला होती. व्हर्जिनियाचा एक भाग, आता हा भाग पश्चिम व्हर्जिनिया या नावाने ओळखला जाणारे निराळे राज्य आहे, पुढे संघराज्याला मिळाला. संघराज्याशी एकनिष्ठ राहिलेली बहुतेक गुलाम राज्ये युद्धातील दोन बाजूंच्या सीमारेषेवर होती. त्यांची निष्ठा टिकवून ठेवणे संघराज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे होते.

संघराज्याची राजधानी आणि लिंकनचे मुख्य ठाणे असलेले वॉशिंग्टन थेट सीमारेषेवर होते. तो आपल्या ऑफिसच्या खिडकीतून पोटोमॅक नदीच्या पलीकडील बंडखोरांचा प्रदेश पाहू शकत होता.

संघराज्याची बाजू कॉन्फेडरेट बाजूपेक्षा संख्येने वरचढ होती आणि त्याचे अद्ययावत उद्योगधंदे युद्ध चालू ठेवायला समर्थ




*यादवी युद्धाच्या वेळेची अमेरिका: मध्यावरील आडव्या तुटक रेषेखाली कॉन्फेडरेट राज्ये आहेत तर लिंकनच्या नेतृत्वाखाली संघराज्य बचविण्यासाठी लढणारी राज्ये या रेषेच्या वर आहेत. पश्चिम व्हर्जिनिया प्रथम बंडखोर व्हर्जिनियाचाच एक भाग होते, पण १८६१ मध्ये ते वेगळे राज्य झाले व संघराज्याला येऊन मिळाले.*


होते. पण शेतीप्रधान दक्षिणेच्या बाजूने दोन महत्त्वाच्या गोष्टी होत्या त्या प्रारंभी उत्तरेकडे नव्हत्या. एक, जिवाबर उदार होणे आणि दोन, अत्यंत कुशल सेनापती. असामान्य गुणांचा आणि लिंकनप्रमाणेच एकसंध वृत्तीचा महामेरू, व्हर्जिनियाचा रॉबर्ट ई. ली म्हणजे या सर्वांचा कळस होता.

उलट लिंकनच्या पदरी पुष्कळ काळपर्यंत असलेले सेनापती अकार्यक्षम, आळशी, भित्रे किंवा तिन्हींचे मिश्रण असलेले होते. याचा परिणाम रणांगणावर दिसत होता. पूर्वेकडील राज्यांच्या टेकड्यांवरून रक्ताने माखलेली प्रेते इतस्ततः विखुरली होती.

## शिव्यांची लाखोली

युद्धाला पहिल्यांदा मोठे तोंड दिनांक २१ जुलै १८६१ या दिवशी व्हर्जिनियात बुलरन येथे फुटले. या लढाईत उत्तरेचा धुव्वा उडाला. संघराज्याच्या सैन्याने जवळजवळ घाबरूनच पळ काढला. ही बातमी ऐकल्यावर संयमी स्वभावाच्या लिंकनचाही तोल गेला आणि त्याने संतापाने शिव्यांची लाखोली वाहिली. १८६१ संपून १८६२ आले, पण परिस्थिती होती तशीच राहिली.





उत्तरेला मिळालेला विजय आणि तिची आगेकूच अगदी मामुली होती. उलट मृतांची संख्या मोठी होती. एप्रिल १८६२ मध्ये टेनेसीमधील शिलो येथे दोन दिवस घनघोर लढाई झाली. दक्षिणेने अखेर माघार घेतली पण उत्तरेला तो विजय फार महाग पडला. दोन्ही बाजूंचे जवळजवळ तेरा हजार सैनिक यात मृत्युमुखी पडले.

सबंध उन्हाळाभर संघराज्याचा सेनापती जी.बी. मॅक्क्लेलन याने पूर्व व्हर्जिनियाजवळ असताना कॉन्फेडरेटची रिचमंड ही राजधानी काबीज करण्याचा प्रयत्न केला. तो राजधानीच्या अगदी निकट आला आणि मग थोडक्यात अयशस्वी ठरला. आणखी सदतीस हजार सैनिक म्हणजे संघराज्याचे जवळजवळ अर्धे सैन्य या लढाईत कामी आले.

ऑगस्टमध्ये दोन्ही सैन्ये पुन्हा बुलरन येथे समोरासमोर आली. येथे लहानशी नदी ओलांडून रेल्वे मार्ग मॅनासस जंक्शनकडे जात होता. या 'दुसऱ्या बुलरन' च्या लढाईचा शेवट उत्तरेचा दारुण पराभव होण्यात झाला. पुन्हा सपशेल माघार घ्यावी लागली आणि मृतांची संख्या चौदा हजारापर्यंत पोहोचली. आता कॉन्फेडरेट

*कबरस्तान होऊ घातलेले रान. टेनेसी राज्यातील शिलो येथील रणांगणाचा 'हॉर्नेट्स नेस्ट' नावाचा भाग. दक्षिणेचे व उत्तरेचे मिळून हजारो सैनिक येथे मारले गेले. शिलोची कत्तल इतिहासात कुप्रसिद्ध ठरली.*

सैन्य वॉशिंग्टनपासून फक्त बत्तीस किलोमीटरपर्यंत येऊन ठेपले होते.

संघराज्याच्या दृष्टीने परिस्थिती खूपच गंभीर होती.

## लिंकनची 'गुप्त अस्त्रे'

लिंकनला दुसऱ्या बुलरनची वार्ता मिळाली तोपर्यंत त्याच्या मनात आशेचे दोन अंकुर फुटले होते. ते म्हणजे दोन गुप्त अस्त्रे, ज्यांच्या बळावर ही भयानक कत्तल थांबविणे शक्य होते.

यांपैकी एक आशा म्हणजे एक माणूस होता - जनरल युलीसिस एस. ग्रँट.

ग्रँट खरोखर एक असाधारण व्यक्ती होती. त्याला युद्ध आवडत नव्हते, सैनिकाचा पेशाही आवडत नव्हता. तसे पाहिले तर बाटली सोडून इतर कशामध्ये त्याला रस नव्हता. पण लढण्याच्या बाबतीत तो उत्तरेच्या इतर सेनापतींसारखा नव्हता. तो वाघासारखा लढायचा. शिलोचा रक्तरंजित विजय ही त्याचीच कामगिरी होती. आता तो मिसिसिपीच्या खोऱ्यात उतरला होता आणि कॉन्फेडरेट सैन्याच्या दक्षिणेतील लांबलचक आघाडीवर हल्ले चढवीत होता. त्याचा जोम लक्षात घेता त्याला यश मिळणे अशक्य नव्हते आणि तो यशस्वी झाला तर कॉन्फेडरेट राज्यांचे दोन तुकडे पडू शकणार होते.

लिंकनचे दुसरे 'गुप्त अस्त्र' अगदी निराळे होते. ते यशस्वी झाले तर त्याच्यामुळे कॉन्फेडरेट आतूनच नष्ट होणार होती, आणि सबंध राष्ट्राची एकता इतके दिवस धोक्यात आणणारी गुलामगिरी नष्ट होणार होती.

''मी गुलामगिरीबद्दल आणि कृष्णवर्णीयांबद्दल जे काही करीत आहे, त्याच्यामुळे संघराज्याला मदत होईल असे मला वाटते म्हणून करीत आहे, आणि जे मी सहन करीत आहे त्याच्यामुळे संघराज्याला वाचविण्यासाठी मदत मिळणार नाही म्हणून सहन करीत आहे. राष्ट्राध्यक्ष या नात्याने माझे उद्दिष्ट काय आहे हे मी येथे स्पष्ट केले आहे. सर्व माणसे मुक्त असावीत हे आपले वैयक्तिक मत मी नेहमी प्रकट केले आहे, आणि त्यात मी काहीही बदल करणार नाही.''

गुलामांच्या मुक्ततेचे लिंकनने दिलेले कारण.

## त्याने गुलामगिरीवर बंदी आणावी काय?

लिंकन 'निर्मूलनकारी' नव्हता पण त्याचे अनेक समर्थक तसे होते. त्यांना खात्री होती की कधी ना कधी तो त्यांच्याशी सहमत होईल आणि जेव्हा युद्धाला तोंड लागले तेव्हा त्यांना तो दिवस आता दूर नाही असे मनोमन वाटू लागले. म्हणून शांततेच्या काळात कोणालाही जे करणे शक्य झाले नसते अशी एक गोष्ट त्यांनी त्याला करायला सांगितली. बंडखोर राज्यातल्या गुलामगिरीचे निर्मूलन करणे.

लिंकनने त्यांचे म्हणणे ऐकून घेतले, त्यांच्या भावनांची कदर केली - पण त्यांच्या विनंतीला नकार दिला. त्याने गुलामगिरीवर बंदी घातली असती तर सीमेवरच्या अतिमहत्त्वाच्या राज्यांचा पाठिंबा एका फटक्यात जाणार होता. शिवाय डेमोक्रॅटिक मंडळींचा पाठिंबाही त्याला गमवावा लागला असता. रिपब्लिकनांच्या या राजकीय प्रतिस्पर्ध्यांना निर्मूलनकारी आणि कृष्णवर्णीय या दोघांचाही तिटकारा होता. पण सध्यापुरते ते संघराज्याला वाचविण्यासाठी




चाललेल्या युद्धात भाग घ्यायला तयार होते. त्याने दक्षिणेतल्या गुलामगिरीवर बंदी घातली तर या दोन राजकीय पक्षांतला तह एका क्षणात संपुष्टात आला असता, उत्तरेचे तुकडे पडण्याची शक्यता होती आणि दक्षिणेचा विजय झाला असता.

'निर्मूलनकारी' माघारी फिरले पण ते पुन्हा पुन्हा आले आणि लिंकनने पुन्हा नकार दिला. त्यांनी आपली बाजू अधिक जोराने मांडायला सुरुवात केली व एक नवीन मुद्दा भरीला घातला. युद्धापूर्वी दक्षिणेच्या कापसाचे मुख्य गिऱ्हाईक ब्रिटन होते, तेव्हा ब्रिटनने कॉन्फेडरेसीला स्वतंत्र देश म्हणून मान्यता देण्याची चांगलीच शक्यता होती. कदाचित युद्धात दक्षिणेच्या बाजूने भाग घेण्याचीही शक्यता नाकारता येत नव्हती आणि तसे झाले तर सर्वच संपुष्टात येणार होते.

पण ब्रिटनला गुलामगिरी मान्य नव्हती. मग उत्तरेने गुलामगिरीवर बंदी घालण्याचा निर्णय घ्यायला काय हरकत होती?

## होकाराचा प्रारंभ

लिंकनने पुन्हा एकदा नाही म्हटले. मात्र मनातल्या मनात आता तो हो म्हणू लागला होता. व्यक्ती म्हणून तो निर्मूलनकारींशी सहमत होता व ते साहजिक होते, आणि समता व स्वातंत्र्य या संघराज्यांच्या आदर्शांबद्दल त्याला आदर होता. त्याच्यातला



मुक्तीचा जाहीरनामा निघण्यापूर्वीच दक्षिणेच्या काळ्या गुलामांनी युद्धामुळे मिळालेल्या संधीचा फायदा घ्यायला सुरुवात केली होती. व्हर्जिनियातील या कुटुंबाप्रमाणे त्यांना माहीत होते की, आपण संघराज्याच्या सैन्याच्या आड गेलो की सुरक्षित आणि मुक्तही होऊ. पुष्कळ मालकांनी आपल्या गुलामांना लढाईच्या क्षेत्रापासून दूर नेऊन त्यांना रोखण्याचा प्रयत्न केला. पण तोवर गोऱ्या मालकांची आपल्या गुलामांवरची पकड सैल होऊ लागली होती. गुलामांनी त्यांचे हुकूम झुगारून लावले. ते आपल्या जागी ठाम राहिले, त्यांनी काम करायला नकार दिला आणि निसटून जाण्याच्या संधीची वाट पाहत राहिले.

राजकारणी नाही म्हणत होता.

पण आता त्याच्यातला राजकारणीदेखील निर्मूलनकारींच्या म्हणण्याशी सहमत होऊ लागला होता. या भयंकर युद्धात त्याचा एकमेव उद्देश त्याचे प्रिय संघराज्य वाचविण्याचा होता. गुलामगिरी नष्ट केल्याने कदाचित तो उद्देश सफल होण्याची शक्यता होती.

ब्रिटिशांची याला मान्यता मिळेल का? हो मिळेल. असे केले तर दक्षिणेच्या युद्ध सामर्थ्याचे नक्कीच नुकसान होणार होते. गुलामांशिवाय दक्षिणेची मंडळी काहीच करू शकणार नव्हती. ना उत्पादन ना कमाई.

लिंकनचे दुर्दैव असे की, त्याला आधीच समस्यांनी घेरले होते त्यात आणखी भर पडली. अकुशल सेनानी आणि उतावळे तसेच मनाला लावून घेणारे राजकीय सल्लागार या दोन समस्या तर होत्याच पण आता त्याच्या पत्नीची एक नवीन समस्या उद्भवली.

वॉशिंग्टनमधील घरात लिंकनच्या बरोबर त्याचा मुलगा टॅड याचे छायाचित्र. टॅड किंवा टॅडपोल म्हणजे छोटा बेडूक. त्याचे डोके मोठे होते म्हणून त्याला लाडाने ठेवलेले हे नाव. त्याचे खरे नाव टॉमस होते. आई वडिलांचे त्याच्यावर निरतिशय प्रेम होते.



## बिचारी मेरी

मेरी त्याची सर्वात गंभीर समस्या होती. आता ती चाळिशीला आली होती, पण लिंकनला १८४२ साली लग्नाच्या वेळी ती जेवढी सुंदर वाटायची तेवढीच अजूनही वाटत होती. त्याचे तिच्यावर आणि तिचेही त्याच्यावर प्राणापलीकडे प्रेम होते.


पण म्हणून काही त्यांची कडाक्याची भांडणे व्हायची राहिली नाहीत. त्यांच्यातला जमीन-अस्मानचा फरक तसाच कायम होता. लिंकन शांत होता आणि पुष्कळदा उदास असायचा. उलट मेरी म्हणजे भावनेचे उधाण होते. तिला तिची मित्रमंडळी खूप आवडायची आणि आपल्या शत्रूंचा तिला तेवढाच तिटकारा होता. मात्र एकदा संतापली की ती मित्रांवाही तेवढाच राग करायची.

भरीला भर म्हणजे सुंदर कपडे आणि उंची फर्निचर यांची तिला फार हौस होती. या हौशीमुळे ती आता बरीच अडचणीत सापडली होती.

राष्ट्राध्यक्षांची पत्नी असणे काही सोपे काम नव्हते. विशेषत: त्या घडीला तरी तसे नव्हते. किती केले तरी मेरी दक्षिणेकडची होती. तिचे भाऊ बंडखोरांच्या बाजूने लढत होते, आणि वॉशिंग्टनचा उच्चवर्णीय समाज तिलाही जवळजवळ बंडखोरच समजत होता. आपल्या टीकाकारांची तोंडे बंद करण्यासाठी तिने व्हाईट हाऊसला वॉशिंग्टनमधले सर्वात आलिशान निवासस्थान बनवायचे ठरवले.

तिला त्याच्यासाठी २०,००० डॉलर देण्यात आले. पण तिने त्याच्या दीडपट रक्कम खर्च केली. लिंकनला हे कळले तेव्हा त्याला धक्काच बसला. छानछोकीच्या अन् शोभेच्या वस्तूंवर एवढा पैसा खर्च करायचा! आणि तेही राष्ट्र जीवन-मरणाचा संघर्ष करीत असताना!





अखेर सर्व प्रकरण मिटले खरे, पण मेरीचा तापट स्वभाव काही सुधारला नाही.

व्हाईट हाऊसमध्ये नव वर्षानिमित्त स्वागत समारंभ. १ जानेवारी १८६२ या दिवशी चित्रकाराने हे चित्र काढले. राष्ट्राध्यक्षांच्या वार्षिक कार्यक्रमामधील हा एक नियमित कार्यक्रम असे. चित्रात पाहुण्यांची रीघ लागली असून त्यांच्याशी सतत हस्तांदोलन करणारा लिंकन आपल्या उंचीमुळे उठून दिसत आहे.

## विली आणि टॅड

निदान त्यांची मुले हा तरी त्यांना जोडणारा दुवा होता. सर्वात मोठा रॉबर्ट हा आता वयात आला होता, लहानगा एडी केव्हाच वारला होता. पण अकरा वर्षांचा विली अन् आठ वर्षांचा टॅड म्हणजे उसळत्या जीवनाची मूर्तिमंत प्रतीके होती. त्यांची मस्ती अन् खोड्यांना पारावर नव्हता. त्यांच्या आई-वडिलांचे त्यांच्यावर प्राणापलीकडे प्रेम होते. पण व्हाईट हाऊसमधील नोकर मंडळी मात्र अगदी हैराण व्हायची.

या मुलांमुळे कोणतीही गोष्ट सुरक्षित रहात नव्हती. मस्तीच्या भरात टॅड व्हाईट हाऊसमधल्या घंटा वाजवीत सुटायचा. सरकारी मेजवानीसाठी ठेवलेल्या स्ट्रॉबेरी कोणाच्याही लक्षात यायच्या आधी तो फस्त करायचा. बिछान्यावरच्या चादरींचीही धडगत नव्हती. टॅडने पलंगाला बांधलेली शेळी त्यांच्या चिंध्या करायची. टॅड-टॅडपोल हाच बहुधा यामध्ये पुढाकार घ्यायचा, पण विलीदेखील

*''गुलामाला स्वातंत्र्य दिल्याने आपण मुक्तजनांना स्वातंत्र्याची ग्वाही देत आहोत. आपण जे देत आहोत ते व जे जपत आहोत ते दोन्ही बहुमानाचे आहे. हा मार्ग स्पष्ट आहे, तो शांततेचा, औदार्याचा व न्यायाचा आहे. या मार्गाने आपण गेलो तर जग आपला निरंतर आदर करेल. आणि आपल्याला नेहमी परमेश्वराचा वरदहस्त लाभेल.''.*

*लिंकनने १८६२ मध्ये काँग्रेसला दिलेल्या वार्षिक संदेशातून.*

*''शक्य असेल तर मला हे सरकार वाचविले पाहिजे. जोपर्यंत हातात एखादी तरी खेळी शिल्लक आहे तोपर्यंत मी हा डाव अर्धवट सोडून हार स्वीकारणार नाही.''*

*लिंकनने न्यू ऑर्लीन्सच्या एकनिष्ठ संघराज्यवाद्यांना १८६२ मध्ये लिहिले त्यातून.*

काही कमी नव्हता. अशा रीतीने त्या खोड्या, ते खेळ आणि ते खदखदून हसणे चालूच होते, पण अचानक एक भयंकर दिवस उगवला. फेब्रुवारी १८६२ मध्ये एके दिवशी दोन्ही मुले ताप येऊन आजारी पडली.

टॅड बरा झाला, पण विली गेला. आता मेरीचा सर्वांत मोठा अन् सर्वांत धाकटा अशी दोनच मुले उरली. ती इतकी शोकाकुल झाली की, तीन महिने आपल्या खोलीच्या बाहेरच पडली नाही.

राष्ट्राध्यक्षांनाही धक्का बसला, पण ते मन घट्ट करून काम करीत राहिले. युद्ध जिंकण्याचे प्रयत्न त्यांनी थांबविले नाहीत.

## मनाचा निश्चय झाला

लिंकनने मनात एक विचार पक्का केला. सीमेवरच्या राज्यांच्या संमतीने गुलामगिरी हळूहळू नष्ट करायची. पण त्या राज्यांना विचारले तेव्हा त्यांनी त्याला सपशेल नकार दिला.

लिंकनने पुन्हा स्वतःशी विचार केला. सरळ मार्गाने गोष्ट होत नसेल तर कठीण मार्ग अवलंबिणे प्राप्त होते. सरळपणे संमती शक्य नसेल तर युद्ध काळामुळे त्याला जे प्रचंड अधिकार मिळाले होते ते वापरायचे त्याने ठरविले.

जुलै १८६२ मध्ये त्याने निर्णय घेतला. लिंकनला युद्ध संपुष्टात आणायचे होते. त्याचबरोबर त्याला गुलामांचीही आवश्यकता होती - गुलाम म्हणून नव्हे तर स्वतंत्र माणसे म्हणून. एकदा स्वतंत्र झाले की, ते उत्तरेला पाठिंबा द्यायला तयार होतील, कदाचित उत्तरेच्या बाजूने लढतील देखील. त्यांचे स्वातंत्र्य त्यांच्या हाती होते आणि त्यांना ते बहाल करायची वेळ आली होती.

संघराज्याचा सरसेनापती या नात्याने लिंकन त्यांची मुक्तता जाहीर करणार होता.

## विजयाची प्रतीक्षा

आपला विचार लिंकनने आपल्या सल्लागारांना सांगितला तेव्हा ते स्तंभित झाले. त्यांनी लगेच त्याला सबुरीचा सल्ला दिला. हे वादग्रस्त, अत्यंत धोक्याचे पाऊल होते, आणि ते उचलण्याची वेळही चुकीची होती. उत्तरेला एखादा मोठा विजय मिळालेला असता तर गोष्ट वेगळी होती. पण आताच्या परिस्थितीत अध्यक्षांचा हा बेत म्हणजे गुलामांना बंड करायला चिथावणी देणारा एक अर्धांकच्या प्रयत्न आहे असे त्यांना वाटले. अनिच्छेने लिंकनने त्यांचे म्हणणे मान्य केले. संघराज्याला एखाद्या विजयाची वाट पाहण्यावाचून गत्यंतर नव्हते, अर्थात् तो कधी मिळालाच तर!

दिनांक ३१ ऑगस्ट १८६२ रोजी आली ती बुलरनच्या इतिहासाच्या पुनरावृत्तीची बातमी. शत्रू आता संघराज्याच्या हद्दीत



शिरला होता आणि राजधानीला वेढा घालून उत्तरेकडे कूच करीत होता.

लिंकनचा सर्वांत कर्तबगार सेनापती ग्रँट अजून दक्षिणेत मिसिसिपीवर होता. निराश होऊन त्याने कचखाऊ मॅक्‌क्लेलनला जमेल ते करायला पाठवले.

## राष्ट्राध्यक्षांचा करार

आणि मग आपल्या ऑफिसच्या एकांतात मनोमन देवाला साक्ष ठेवून लिंकनने शपथ घेतली. तसा तो धार्मिक प्रवृत्तीचा माणूस नव्हता, पण परिस्थितीच तशी होती. त्याने मनात ठरवले की मॅक्‌क्लेलनला दक्षिणेतील लोकांवर विजय मिळाला तर तो उजवा कौल मानायचा; गुलामांना मुक्त करण्याचा आपला निर्णय बरोबर आहे याचा तो कौल मानायचा.

मॅक्‌क्लेलन जिंकला तर मुक्तीचा जाहीरनामा काढायचा असे लिंकनने ठरवले.

सप्टेंबर १७ ला ॲन्टीटम क्रीक नावाच्या ओढ्याजवळ दोन्ही फौजा समोरासमोर आल्या. घनघोर लढाईनंतर मॅक्‌क्लेलन जिंकला. मात्र नेहमीप्रमाणेच विजयाची किंमत जबर मोजावी लागली. केवळ संघराज्याचेच बारा हजार सैनिक धारातीर्थी पडले आणि नेहमीप्रमाणेच मॅक्‌क्लेलनने विजयामुळे मिळालेली संधी हातची दवडली. आपला हल्ला त्याने शेवटपर्यंत रेटला नाही, त्यामुळे

*ॲन्टीटम क्रीकच्या लढाईनंतरचे दृश्य. या लढाईत उत्तरेला मिळालेल्या विजयाची बातमी लिंकनला मिळाली तेव्हा गुलामांच्या मुक्ततेची आपली योजना पुढे नेण्याचा त्याला हुरूप आला. पण देवाचा कौल मिळाला तरी त्याची किंमत जबर मोजावी लागली - एकवीस हजार लोक आपल्या प्राणांना मुकले.*





दक्षिणवासीयांना लढाईत जरी चांगला फटका बसला होता तरी ते मागे वळून व्हर्जिनियात पळून जाऊ शकले.

पण काही झाले तरी तो विजय होता. सप्टेंबर २२ या दिवशी लिंकनने मुक्तीचा प्राथमिक जाहीरनामा काढला. त्यात त्याने आश्वासन दिले की, १ जानेवारी १८६३ पर्यंत गुलाम राज्यांनी युद्ध थांबविले नाही तर त्यांच्यातल्या सर्व गुलामांना मुक्त करण्यात येईल.

अर्थात ती राज्ये युद्ध थांबवतील अशी त्याला मुळीच अपेक्षा नव्हती.

## १८६३ चा नव वर्षदिन

आणि झालेही तसेच. १ जानेवारी १८६३ हा दिवस उजाडला तरी उत्तर व दक्षिण या दोन अमेरिका एकमेकींच्या जिवावर उठलेल्या होत्या. अखेर थरथरत्या हाताने अब्राहम लिंकनने मुक्तीच्या जाहीरनाम्यावर सही केली. टेक्सस, आर्कान्सॉ, मिसिसिपी, आलाबामा, फ्लॉरिडा, जॉर्जिया, कॅरोलिना, आणि व्हर्जिनिया व लुइझियानाचा बराचसा भाग या सर्व प्रदेशांत गुलामगिरीवर बंदी आली.

*युद्ध - एक कल्पना आणि एक सत्य. समोरच्या पानांवरील चित्रात मिसिसिपीमधील व्हिक्सबर्ग येथे संघराज्याच्या सैन्याने कॉन्फेडरेट सैन्यावर केलेल्या हल्ल्याचे दृश्य दिसत आहे. उत्तरेच्या लोकांची युद्धाबद्दल काय कल्पना होती त्याचे हे चित्रण आहे. त्यात रणांगणावरची खरी परिस्थिती दिसत नाही. खालच्या छायाचित्रात आघाडीवरच्या जीवनाचे अधिक यथार्थ दृश्य आहे. त्यात एक शिपाई आपल्या जखमी सहकाऱ्याची काळजी घेत आहे.*



*उजवीकडे : सुरुवातीला लिंकनच्या सैन्यात स्वेच्छेने येणाऱ्या लोकांचा भरणा होता. पण १८६३ मध्ये उत्तरेने २० ते ४५ वर्षे वयाच्या सर्व सुदृढ माणसांची सक्तीने सैन्यात भरती करण्यास प्रारंभ केला. या सक्तीमुळे संतापून जाऊन त्यांनी बऱ्याच शहरांत सक्तीच्या सैन्यभरतीच्या विरोधात दंगे केले. चित्रात न्यूयॉर्कमध्ये दंगेखोर सैन्यभरती कार्यालयाला आग लावताना दिसत आहेत. त्यानंतर त्यांनी शहरातल्या कृष्णवर्णीयांवर खुनी हल्ले चढविले. हा दंगा शमला जाईस्तोवर पाचशे लोकांचे बळी गेले होते.*




संघराज्याने जे प्रदेश परत घेतले होते, किंवा पश्चिम व्हर्जिनियाप्रमाणे जे स्वत: परत आले होते त्यांना व गुलामगिरीची प्रथा चालू असलेल्या सीमावर्ती राज्यांना जाहीरनाम्यातून वगळण्यात आले व या राज्यांची निष्ठा टिकवून ठेवणे आता अधिक अगत्याचे झाले होते. उत्तर जिंकली की त्यांच्याबाबतीत काहीतरी नंतर करायला वेळ होता.

## दोन आघाड्यांवर लढाई

लिंकनच्या त्या महान निर्णयामुळे त्याच्यावर युद्ध हरण्याची पाळी येऊ शकली असती. त्याला मिळालेला जनतेचा पाठिंबा खूपच कमी झाला. ऑक्टोबर १८६२ मध्ये, म्हणजे मुक्तीच्या प्राथमिक जाहीरनाम्यानंतर, उत्तरेत अनेक ठिकाणी झालेल्या निवडणुकीच्या फेरीत बऱ्याच राज्यांत डेमोक्रॅटिक उमेदवारांनी त्यांच्या रिपब्लिकन प्रतिस्पर्ध्यांना हरविले. हे विजेते गुलामगिरीच्या निर्मूलनाविरुद्ध होते. त्यांना कृष्णवर्णीयांची भीती वाटे, आणि हे मुक्त झालेले काळे गुलाम लोंढ्याने उत्तरेला येतील आणि गोऱ्यांच्या बरोबरीने राहतील व काम करतील ही कल्पनाही त्यांना नकोशी वाटत होती.

*"एखादे सरकार आपल्या स्वत:च्याच जनतेच्या स्वातंत्र्याची पायमल्ली करू शकण्याइतके सामर्थ्यवान किंवा आपले स्वत:चे अस्तित्वही टिकवू शकणार नाही इतके दुर्बळ असावे काय?"*

*लिंकनने १८६१ साली स्वातंत्र्यदिनानिमित्त काँग्रेसला दिलेल्या संदेशातून.*



आपण युद्धात संघराज्याला वाचविण्यासाठी भाग घेतला, गुलामगिरी नष्ट करण्यासाठी नव्हे असे त्यांचे उघड म्हणणे होते. त्यांच्या निषेधाला लवकरच 'युद्ध थांबवा' चळवळीचे स्वरूप आले.

म्हणजे आता लिंकन दोन आघाड्यांवर लढत होता. - एक दक्षिणेची अन् दुसरी घरची म्हणजेच उत्तरेची. त्यातून रणांगणावर त्याला आणि संघराज्याला एकामागून एक भयंकर पराभव सोसावे लागत होते.

## काळे दिवस

डिसेंबरमध्ये फ्रेडरिक्सबर्गची घटना घडली. व्हर्जिनिया राज्यातल्या या गावात एक नदी पार करण्याचा प्रयत्न करीत असताना संघराज्याचे बारा हजार सैनिक उभे कापले गेले. जानेवारी १८६३ मध्ये 'मडमार्च' म्हणजे चिखलातील कूच केली. संघराज्याच्या एक लाख तीस हजार सैनिकांनी पुन्हा तीच नदी ओलांडण्याचा प्रयत्न केला, पण हिवाळी पावसामुळे नदी दाट चिखलाने इतकी गच्च भरली की, त्यात सैनिकांचे पाय अडकले आणि जीव गुदमरले.

आणि मे महिना चान्सलर्जव्हिलचा होता. व्हर्जिनियातच आणि त्याच नदीच्या जवळ या गावामध्ये संघराज्याचे आणखी सतरा हजार सैनिक गारद झाले. गंभीर संकटांना तोंड देण्याची सवय असूनही त्या बातमीने लिंकनचा थरकाप उडाला. अत्यंत विमनस्क अवस्थेत ऑफिसमध्ये येरझारा घालीत तो पुटपुटत राहिला "अरे देवा! देश काय म्हणेल?"

१८६३ चा मे महिना सुरू झाला. त्या सुमारास उत्तर अमेरिका आणि तिचा राष्ट्राध्यक्ष यांची कधी नव्हे इतकी बिकट परिस्थिती झाली होती. सगळीकडे अंधारच अंधार होता.

## गेटिसबर्ग

मात्र महिना संपायला आला तशा मिसिसिपीवर गेलेल्या चिवट वृत्तीच्या ग्रँटकडून चांगल्या बातम्या यायला सुरुवात झाली. कित्येक महिने तो दक्षिणेच्या मोर्चेबंदीवर हल्ले चढवीत होता, आणि अखेर त्याला यश मिळू लागले होते. उलट उत्तर-पूर्वेला परिस्थिती अधिकच बिघडली.

जूनमध्ये जनरल लीने संघराज्यावर पुन्हा चढाई केली. मेरीलँडमधून कूच करीत तो पेनसिल्व्हानियात शिरला. आता त्याचे सैन्य कोणत्याही क्षणी प्रत्यक्ष वॉशिंग्टनवर हल्ला चढवू शकले असते.


पण तो हल्ला झालाच नाही.

१ जुलै १८६३ या दिवशी दोन्ही अमेरिकी सैन्ये गेटिसबर्ग नगरात शिरली. आणि संपूर्ण युद्धकाळातील सर्वात भीषण लढाई

*"हा मूलत: जनतेचा संघर्ष आहे. संघराज्याच्या बाजूने अशी शासन-प्रणाली टिकविण्यासाठी संघर्ष आहे जिचा मुख्य उद्देश जनसामान्यांची परिस्थिती अधिक उंचावणे हा आहे. कोणाच्याही खांद्यावर कृत्रिम ओझे नसावे. चांगल्या उद्दिष्टासाठी झटण्याचा मार्ग सर्वांना मोकळा असावा, आणि जीवनाच्या शर्यतीत प्रत्येकाला गळ्यात लोढणे न अडकवता धावण्याची मोकळीक असावी."*

*लिंकनने स्वातंत्र्यदिनानिमित्त १८६१ साली काँग्रेसला दिलेल्या संदेशातून.*





मृतांचे पुण्यस्मरण. वर : व्हिक्सबर्ग नॅशनल सेमेटरीमधील आजचे दृश्य. उजवीकडे : गेटिसबर्ग येथे कबरस्तानचे उद्घाटन व्हायच्या आधीच्या दिवशी लिंकन तेथे बात असतानाचे दृश्य. आगगाडीच्या जवळ उंच हॅट घातलेला माणूस बहुधा लिंकन असावा. कोणालाही माहीत नाही पण त्या वेळी त्याला देवीसदृश आजाराने ग्रस्त केले होते. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाने तो पार थकून गेला.



तेथे झाली. दोन दिवस चाललेल्या त्या लढाईत चाळीस हजार सैनिक गारद झाले, किंवा जखमी झाले. पण संघराज्याचा विजय झाला होता आणि बंडखोर दक्षिणेला माघार घेऊ लागले होते.

त्यातून ७ जुलैला ग्रँटकडून जी बातमी आली तिने उत्तरेच्या विजयावर शिक्कामोर्तब झाले. त्याने मे महिन्यापासून मिसिसिपीवरच्या व्हिक्सबर्ग शहराला वेढा घातला होता तो अखेर यशस्वी झाला होता. दक्षिणेचा खूप दूरवरचा भाग आता त्याच्या पकडीत आला होता.

परिस्थिती बदलत होती.

## संघराज्याच्या मृतांची थडगी

आज गेटिसबर्ग हे नाव ट्रॅफल्गार किंवा वॉटर्लू इतके प्रसिद्ध आहे. पण ही प्रसिद्धी गेटिसबर्गला तेथे झालेल्या लढाईमुळे मिळाली नाही तर त्यानंतर जे घडले त्यामुळे मिळाली.

दिनांक १८ नोव्हेंबर १८६३ या दिवशी शहराच्या बाहेर एका टेकडीवर दीड लाख माणसे जमली होती. संघराज्याचे जे सैनिक त्या लढाईत धारातीर्थी पडले होते त्यांच्यासाठी एका स्मशानभूमीचे तेथे उद्घाटन व्हायचे होते. स्वच्छ सूर्यप्रकाशात उभे राहून श्रोत्यांनी दोन तास समारंभाच्या प्रमुख वक्त्याचे भाषण ऐकले. नंतर पाळी आली ती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष अब्राहम लिंकन यांची.

लिंकनचे भाषण दोन तास नव्हे तर दोन मिनिटे चालले. ते इतके छोटे अन् इतके साधे होते की, काही श्रोते अगदी आश्चर्यचकित झाले, काहींनी त्या साधेपणाचे टाळ्या वाजवून कौतुक केले. पण पुष्कळांना ते भाषण ऐकूच गेले नाही.

त्यांना ऐकू न गेलेले ते शब्द आता 'गेटिसबर्गचा संदेश' या नावाने जगप्रसिद्ध आहेत. चांगले प्रशासन कशाला म्हणावे हे थोडक्यात सांगणारे ते भाषण म्हणजे लोकशाहीच्या इतिहासात एक संस्मरणीय टप्पा ठरला आहे.


## '८७ वर्षांपूर्वी..'

लिंकन म्हणाला "आपल्या पूर्वजांनी स्वातंत्र्य आणि समता या दोन तत्त्वांवर ८७ वर्षांपूर्वी या नव्या राष्ट्राची उभारणी केली. आता आपण मात्र एका भीषण यादवी युद्धात गुंतलो आहोत. स्वातंत्र्य व समता या तत्त्वांवर आधारलेले हे किंवा कोठलेही राष्ट्र फार काळ टिकू शकेल की नाही हे या युद्धाने ठरणार आहे. एका महान युद्धभूमीवर आपण एकत्र जमलो आहोत. हे राष्ट्र जगविण्यासाठी ज्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली त्या सैनिकांसाठी अखेरचे विश्रांतिस्थान म्हणून या रणांगणाचा एक भाग त्यांना अर्पण करण्यासाठी आपण येथे आलो आहोत. आपण असे



"आपण एका महान रणांगणावर एकत्र जमलो आहोत..." मंचावर भाषण करीत असलेला लिंकन. त्यावेळी त्याने अमेरिकेच्या इतिहासातले सर्वात अविस्मरणीय भाषण केले. त्या दिवशी वादळी हवा होती. आणि लिंकनचा नेहमी त्याच्या श्रोत्यांपर्यंत सहज पोहोचणारा आवाज त्या दिवशी शेवटपर्यंत पोहोचू शकला नाही. आपल्या भाषणाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही हे पाहून लिंकन उदास झाला.





करणे सर्वथैव योग्यच आहे. व्यापक अर्थाने पाहिले तर ही भूमी आपण समर्पित करू शकत नाही, पावन करू शकत नाही. ज्या मृत आणि जिवंत वीरांनी येथे संघर्ष केला त्यांनी ही भूमी इतकी पवित्र केली आहे की, त्या पावित्र्यात भर घालणे किंवा ते कमी करणे आपल्या तुटपुंज्या शक्तीपलीकडचे आहे. आपण आज येथे काय बोलत आहोत हे जगाच्या फारसे लक्षात राहणार नाही, पण वीरांनी येथे जो पराक्रम केला तो जग कधीही विसरणार नाही. ज्या महान कार्यासाठी ते वीर येथे लढले त्या अपूर्ण राहिलेल्या कार्याला स्वतःला वाहून घेणे एवढेच मागे उरलेल्या आपणा सर्वांच्या हाती आहे.

"म्हणून या महान कार्यामध्ये आपण स्वतःला वाहून घेऊया. आपल्या निष्ठेचा शेवटचा अंश पुण्यशील वीरांनी ज्या कार्याला समर्पण केला त्या कार्याला आपण स्वतःला समर्पण करणे हेच आपले खरे कर्तव्य आहे. ज्यांनी या ठिकाणी प्राणार्पण केले त्यांचे बलिदान व्यर्थ न जाऊ देण्याची आपण प्रतिज्ञा करूया. जनतेचे, जनतेसाठी, जनतेने चालविलेले शासन या पृथ्वीवरून नष्ट होऊ देणार नाही असा संकल्प करूया."

## काळ्यांची सैन्यभरती

मार्च १८६४ मध्ये ग्रँटला संघराज्याच्या संपूर्ण सैन्याचा प्रमुख सेनापती नेमण्यात आले. ग्रँटने पूर्वेकडील युद्ध आपल्या हाती घेतले व पश्चिमेकडचे आधिपत्य विल्यम शेर्मन या सेनापतीकडे सोपवले. शेर्मन ग्रँटइतकाच कणखर, कडवा अन् कल्पक होता.

पूर्ण उन्हाळ्यात दोन्ही सेनापतींनी कॉन्फेडरेसीला कधी हल्ला चढवून, कधी माघार घेऊन, कधी दबा धरून तर पुन्हा हल्ला करून .... सतत शह दिला. मृत्युमुखी पडणाऱ्या सैनिकांची संख्या जीव दडपून टाकणारी होती पण अधिकाधिक सैनिकांचा पुरवठा होत राहिला आणि आता स्वयंसेवकांची एक नवीन फळी उभी रहात होती.

संघराज्याचे सैन्य जसे दक्षिणेकडे सरकत गेले तसे हजारो काळे गुलाम त्याच्या आश्रयाला आले. त्यांना त्यामध्ये मुक्ततेचा किरण दिसला. ते या सैन्यात भरती झाले. उत्तरेचे मुक्त कृष्णवर्णीयही त्यांना येऊन मिळाले. ज्या संघराज्याने त्यांची मुक्तता केली. त्यांच्यासाठी लढणाऱ्या कृष्णवर्णीयांची संख्या युद्धाचा अंत होईपर्यंत जवळजवळ दोन लाख झाली होती. आपल्याला त्यांची आवश्यकता पडेल असे लिंकनला वाटले होते ते बरोबर होते. युद्ध जिंकण्यासाठी आता त्याला त्यांची खूपच मदत होत होती.

## पराभव पत्करावा का?

काही काळ मात्र पराभवाचे सावट चांगलेच दाट झाले होते.




गेटिसबर्गच्या विजयानंतरही आणि ग्रँट व शेर्मन यांनी प्रयत्नांची शर्थ केली तरी कॉन्फेडरेट सैन्याने अजून माघार घेतली नव्हती. उलट लिंकनला अध्यक्षपद गमवावे लागण्याची चिन्हे स्पष्ट दिसत होती. राष्ट्राध्यक्षाची निवडणूक जवळ आली होती, पण तो खूपच अप्रिय झाला होता, आणि उत्तरेला आता शांततेची ओढ लागली होती.


लिंकनने माघार घ्यायची का? मुक्तीचा जाहीरनामा फाडून टाकून दक्षिणेशी तह करायचा का? गुलामगिरी खुशाल चालू ठेवा असे त्यांना सांगायचे का? त्या कल्पनेने त्याचा थरकाप उडाला. या कल्पनेने दिनांक २४ ऑगस्ट १८६४ या दिवशी फक्त एकाच भयंकर क्षणी त्याचा थरकाप उडाला, पण नंतर तो त्याच्यावर गंभीरपणे विचार करू लागला. मात्र दुसऱ्याच दिवशी त्याने स्वतःला सावरले. तहाच्या कोणत्याही योजनेला त्याने नकार दिला आणि अध्यक्षपदाच्या निवडणुकीला तोंड द्यायचा निश्चय केला.

## शेर्मन जॉर्जियात

आणि परिस्थिती अगदी रसातळाला गेल्यासारखी वाटली त्याच वेळी उत्तरेचे नशीब कायमचे उघडले. दोन सप्टेंबरला शेर्मनने जॉर्जियामधले अटलांटा हे 'कापसाच्या राज्यातील' सर्वात मोठे

*समोर : स्वातंत्र्य संग्रामामध्ये भाग घेतलेले मुक्त झालेले कृष्णवर्णीय. डाव्या चित्रात पळून गेलेली गुलाम स्त्री हॅरिएट टबमन. हिने ३०० जणांना पळून जायला मदत केली. अशा लोकांसाठी निर्मूलनकारी मंडळींनी 'अंडरग्राउंड रेल्वे' नावाचा गुप्त मार्ग तयार केला होता. यादवी युद्धात हॅरिएटने गुप्तहेर म्हणून काम केले. खाली : पुष्कळ दक्षिणवासीयांनी लढाईत पकडलेल्या काळ्या सैनिकांना युद्धकैदी म्हणून वागवायला नकार दिला. कॉन्फेडरेट सैन्याने १८६४ मध्ये हा किल्ला सर केला तेव्हा त्यांनी काळ्या युद्धकैद्यांना जिवंत जाळले किंवा गोळ्या घालून ठार मारले.*





युद्धाची किंमत – दक्षिणपूर्वेच्या राज्यातून १८६५ पर्यंत सर्वत्र असा बेचिराख मुलूख दिसत होता. यापैकी बराचसा विनाश जनरल शेर्मनने घडवून आणला होता. पण या चित्रात दिसणाऱ्या उद्ध्वस्त इमारती कॉन्फेडरेटची राजधानी रिचमंड (व्हर्जिनिया) येथील आहेत. त्या त्यांनी संघराज्याच्या सैनिकांच्या हाती पडू नयेत म्हणून स्वतःच आगी लावून उद्ध्वस्त केल्या.

शहर काबीज केले. येथून पुढे त्याने समुद्राच्या दिशेने चारशे किलोमीटर्सची आगेकूच केली. शेर्मनच्या नावाला प्रसिद्धी किंवा कुप्रसिद्धी मिळवून देणारी ही कूच शत्रूच्या प्रदेशामधून धारदार तलवारीप्रमाणे कापत गेली. वाटेत दिसेल ते त्याने नष्ट केले. 'संपूर्ण युद्ध' म्हणजे लष्कर व नागरी वस्ती यांच्याविरुद्ध पुकारलेली लढाई हे त्याचे ब्रीदवाक्य होते. त्या वर्षीचा नाताळ येईपर्यंत त्याने प्रचंड भूभाग बेचिराख केला होता.

अटलांटाच्या बातमीने उत्तरेत नवचैतन्य संचारले. एकूण हे भयंकर युद्ध जिंकणे अशक्य नव्हते तर! संघराज्याच्या सैनिकांनी





प्रयत्नांची पराकाष्ठा केली आणि परिणाम असा झाला की नोव्हेंबरला झालेल्या अध्यक्षीय निवडणुकीत लिंकनने आपल्या डेमोक्रॅट प्रतिस्पर्ध्यावर प्रचंड बहुमताने मात केली.

## पुनश्च ऐक्य

पाच महिने गेले आणि ९ एप्रिल १८६५ रोजी दक्षिणेचा सेनापती ली याची भेट उत्तरेचा सेनापती ग्रँट याच्याबरोबर व्हर्जिनियामधील ॲपोमॅटॉक्स कोर्टहाऊस या गावी झाली. या गावी अनेक लढाया

*''शेर्मन कोठल्या बिळातून आत शिरला आहे हे मला माहीत आहे, पण तो कोठल्या बिळातून बाहेर पडेल हे मला सांगता येणार नाही.''*

*शेर्मनने समुद्रापर्यंतीकडे कूच केली तेव्हा तो कोठे आहे याचा विचार करतेवेळी लिंकनला पडलेले कोडे.*



कॉन्फेडरेट सैन्याने एप्रिल ९, १८६५ रोजी ॲपोमॅटॉक्स कोर्ट-हाऊस येथे शरणागती स्वीकारली. डावीकडे दक्षिणेचा महान सेनापती रॉबर्ट ई. ली एका लहानशा टेबलावर शरणागतीच्या दस्तऐवजावर सही करीत आहे. उजवीकडे युलीसिस ग्रँट पहात आहे. यानंतर काही ठिकाणी लढाई काही काळ चालू राहिली, पण युद्ध संपले होते.

झाल्या होत्या. दक्षिणेच्या त्या महान सेनापतीने शरणागती पत्करली. त्याने फक्त एकच विनंती केली की, त्याच्या सैनिकांना आपले घोडे ठेवायची परवानगी असावी. वसंत ऋतूत जमीन नांगरायला त्यांची आवश्यकता होती.

ग्रँटने आपल्या फौजेमध्ये युद्ध संपल्याची घोषणा केली. अमेरिकेचे संघराज्य पुन्हा एकसंध झाले.

## युद्ध जिंकले, आता शांतता जिंकायची

वॉशिंग्टनमध्ये आणि साऱ्या उत्तरेत हर्षोल्हासाची एकच लाट उसळली. बँड वाजू लागले, घंटा निनादू लागल्या आणि लोक रस्त्यावर येऊन संघराज्याचा आणि राष्ट्राध्यक्षांचा जयजयकार करू लागले. पण व्हाईट हाऊसमध्ये लिंकन अधिकच कामात गुंतला. युद्ध तर जिंकले आता काहीही करून शांतता जिंकायची होती. युद्धाने उद्ध्वस्त झालेल्या देशाला पुन्हा उभारायचे होते. शिवाय एकेकाळच्या बंडखोरांना, ज्या जीवनपद्धतीत काळे गुलाम दिमतीला नसतील अशी एक अगदी नवीन जीवनपद्धती स्वीकारण्यासाठी वळवायचे होते.



काम कठीण होते. पण लिंकनने दृढ निश्चय केला होता. विशेष म्हणजे त्याने शांतता शांततेनेच जिंकायची ठरवले होते. आणि तीसुद्धा 'कोणाच्याही बद्दल मनात द्वेष न बाळगता, सगळ्यांच्या बद्दल उदार वृत्ती ठेवून.'

## "अवर अमेरिकन कझिन"


थोड्या दिवसांनी १४ एप्रिल या दिवशी, ईस्टरच्या मोठ्या ख्रिस्ती सणाच्या आधीचा शुक्रवार, 'गुड फ्रायडे' होता. लिंकन देशाचे पुनर्निर्माण करण्यात गुतला होता, आणि त्याचा दिवस नेहमीच्याच गडबडीत गेला - बैठका, निर्णय, सल्ला. संध्याकाळी तो नेहमीप्रमाणे आपली पत्नी मेरी हिच्याबरोबर घोडागाडीतून शहरात फेरफटका मारायला गेला. त्यावेळी फोर्डस् थिएटरमध्ये 'अवर अमेरिकन कझिन' नावाचे विनोदी नाटक लागले होते. ते रात्री पहायला जायचे असा त्यांचा बेत ठरला.

रात्री आठ वाजल्यानंतर लिंकन आणि मेरी बग्गीत बसून काळोख्या, धूसर रस्त्यांवरून नाट्यगृहाकडे निघाले. वाटेत दोन स्नेह्यांना घेऊन ते सभागृहात पोहोचले तेव्हा नाटक सुरू झाले होते. परंतु सर्व प्रेक्षकांनी उभे राहून लिंकनला अभिवादन केले.

## आणि मारेकऱ्याने डाव साधला

राष्ट्राध्यक्षांच्या 'बॉक्स' च्या बाहेर लिंकनचा अंगरक्षक पहाऱ्यासाठी उभा राहिला आणि आश्चर्य म्हणजे थोड्या वेळाने सहजगत्या

अब्राहम लिंकनचा खून - दिनांक १४ एप्रिल १८६५. एका हातात सुरा घेतलेला जॉन विल्कीस बूथ दुसऱ्या हाताने राष्ट्राध्यक्षांच्या डोक्यात पिस्तुलाची गोळी झाडीत आहे. लिंकनच्या अंगरक्षकाने आपली जागा सोडल्याने बूथ कोणालाही नकळत सरकारी 'बॉक्स' मध्ये शिरला. त्या वेळी जरी तो पळून जाण्यात यशस्वी झाला असला तरी काही दिवसांतच त्याला हुडकून काढून ठार करण्यात आले.



*''दिसायला ओबडधोबड, कमालीच्या ऋजु स्वभावाचा, विलक्षण विचक्षण बुद्धीचा, निर्णय घेतेवेळी खूप अनिश्चयी पण घेतलेला निर्णय पटविण्याची हातोटी असणारा, अगदी विचित्र, वेडेवाकडे, विनोदी अन् तरीही महानपणाने ओतप्रोत भरलेले व संपूर्णपणे कल्याणकारी असे हे व्यक्तिमत्त्व...''*

*न्यूयॉर्कच्या 'हेराल्ड'ने लिंकनवर लिहिलेल्या मृत्युलेखातून.*

*''एखाद्या नेत्याच्या पतनानंतर राष्ट्राने इतका शोक कधीही केला नसेल. लिंकनच्या मित्रांना तर त्याच्या मृत्यूने शोक झाला, तसाच तो त्याच्या असंख्य विरोधकांनाही झाला. तो जिवंत असताना ज्यांनी त्याची निर्भर्त्सना केली होती, हुकूमशहा म्हणून ज्याची संभावना केली होती, ज्याला माकड संबोधून हिणवले केली होती त्यांनाही त्याच्या मृत्यूचा शोक झाला आणि देशासाठी हळहळ वाटली.''*

*'विथ मॅलीस टोवर्ड नन' या स्टीफन बी. ओटस् लिखित चरित्रामधून*

कोठेतरी निघून गेला. नाटक खूपच रंगले. सगळ्यांचे डोळे स्टेजवर खिळले होते - इतक्यात बंदुकीच्या गोळीचा आवाज झाला. क्षणभर सगळे जण जणू काय श्वास रोखून स्तब्ध राहिले आणि मग 'बॉक्स'मधून किंकाळ्यांवर किंकाळ्या ऐकू येऊ लागल्या.

स्तंभित होऊन सर्वजण पहात होते. इतक्यात एक माणूस हातात सुरा घेऊन 'बॉक्स'च्या पुढच्या भागाकडे धावला. ओरडत त्याने लिंकनच्या एका मित्रावर वार केला, आणि मग धाडकन स्टेजवर उडी मारून तो धडपडत अंधारात नाहीसा झाला.

सगळ्यांच्या नजरा पुन्हा बॉक्सवर वळल्या. तेथे तीन माणसे किंकाळत एका व्यक्तीवर वाकली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आपल्या खुर्चीत निपचित पडले होते. मारेकऱ्याची गोळी त्यांच्या मेंदूत घुसली होती. अब्राहम लिंकन मरणाच्या दाराशी पडला होता.

## राष्ट्राध्यक्षांचा मृत्यू

पुढचे नऊ तास फार भयंकर गेले. नाटयगृहात भीतीने एकच कल्लोळ उडाला. मारेकरी पळून जात होता त्याचवेळी सैन्यातला एक डॉक्टर कसाबसा लिंकनपर्यंत पोचला आणि त्याने त्याला कृत्रिम श्वासोच्छ्वास दिला. मग लिंकनला नाटयगृहाच्या समोर एका घरात नेऊन झोपविण्यात आले. या अनपेक्षित धक्क्याने अन् दुःखाने वेडीपिशी झालेली मेरी त्यांच्याबरोबर होती. ग्रँटच्या पदरी नोकरीला असलेला त्याचा मुलगा रॉबर्टही बरोबर होता. बातमी वणव्यासारखी वॉशिंग्टनभर पसरली. डॉक्टर, राजकीय नेते आणि मित्रमंडळींची रीघ त्या घराकडे लागली.

पुष्कळांनी लिंकनच्या मारेकऱ्याला ओळखले होते. तो जॉन विल्किस बूथ नावाचा नट होता. तो हळूच अध्यक्षांच्या बॉक्समध्ये शिरला होता आणि त्याने पाठीमागून अगदी जवळून गोळी झाडली होती.

बूथचे दक्षिणेबद्दलचे प्रेम सर्वश्रुत होते. दक्षिणेचा विनाशकर्ता म्हणून लिंकनचा तो द्वेष करीत असे, हे सर्वविदित होते. फोर्डस् थिएटरमध्ये तो ओरडला होता, 'सर्व जुलमी राज्यकर्त्यांचा असाच अंत होत असतो.' ताबडतोब त्याला हुडकून काढण्यासाठी शोधपथके पाठविण्यात आली व राजधानीत लष्करी कायदा पुकारण्यात आला. लिंकनचा उपराष्ट्राध्यक्ष अँड्रू जॉन्सन याला घटनास्थळी बोलावण्यात आले. त्या घराच्या बाहेर शोकाकूल जनता पुढील बातमीची वाट पहात उभी राहिली.

सकाळ झाली आणि १५ एप्रिल १८६५ या दिवशी शनिवारी सकाळी सात वाजून बावीस मिनिटांनी अब्राहम लिंकनने या जगाचा निरोप घेतला. मारेकऱ्याला बळी पडलेला तो पहिला अमेरिकन राष्ट्राध्यक्ष होता - शेवटचा नव्हे.



## तेरावी घटनादुरुस्ती


लिंकन मरण पावला त्या आठवड्यात त्याच्या १८६३ च्या जाहीरनाम्याने आणि संघराज्याच्या सैन्याने पस्तीस लाख गुलामांना मुक्तता बहाल केली होती. जिवंत असताना लिंकनने आपली मुक्ती योजना बरीच पुढे नेण्याचे ठरवले होते.

त्याला चांगलेच माहीत होते की, शांतता प्रस्थापित झाल्यावर आपला युद्धकालीन जाहीरनामा उलटविता येईल. शिवाय या जाहीरनाम्याने फक्त बंडखोर राज्यातल्या गुलामांना मुक्ती मिळाली होती, बाकीचे अजूनही गुलामीत होते. म्हणून पुन्हा निवडून आल्यावर त्याने अगदी नव्या व व्यापक कायद्याची कॉंग्रेसकडे शिफारस केली होती. हा कायदा म्हणजे घटनेची दुरुस्ती होती व या दुरुस्तीनुसार अमेरिकेत सर्वत्र गुलामगिरीच्या प्रथेवर बंदी येणार होती.

जानेवारी १८६५ मध्ये कॉंग्रेसने त्याची शिफारस स्वीकारली व अगदी थोड्या बहुमताने घटनेत तेरावी दुरुस्ती करण्यात आली, ज्यायोगे 'अमेरिकन संघराज्यात कोठेही गुलामगिरी किंवा सक्तीची चाकरी (फक्त सिद्ध झालेल्या गुन्ह्याची शिक्षा वगळता) अस्तित्वात राहणार नव्हती.'

या दुरुस्तीला कायद्याचे स्वरूप प्राप्त झाल्यावर संपूर्ण अमेरिकेतल्या गुलामांना मुक्तता मिळणार होती.

*एप्रिल २१, १८६५ या दिवशी सबंध उत्तर अमेरिकेत नागरिकांनी रस्त्यावर येऊन आपल्या दिवंगत राष्ट्राध्यक्षांना श्रद्धांजली वाहिली. लिंकन आणि त्याचा मुलगा विली यांच्या शवपेटिका सरकारी इतमामाने वॉशिंग्टनपासून स्प्रिंगफिल्डपर्यंत त्यांच्या अखेरच्या विश्रांतिस्थानी नेण्यात आल्या. चित्रातला शोकाकूल जनसमुदाय अंत्ययात्रा संचालनाच्या ठिकाणी जमलेला दिसत आहे.*



*नावाचे स्वातंत्र्य मिळाले, पण जुलूम चालू राहिला. १८६० चे दशक संपले तेव्हा काळे अमेरिकन तत्त्वत: गोऱ्यांच्या बरोबरीचे झाले होते. पण उत्तरेत व दक्षिणेत दोन्ही ठिकाणी पुष्कळ गोऱ्या अमेरिकनांचा काळ्यांच्या समतेला कडाडून विरोध होता. व्यंगचित्रात दाखविल्याप्रमाणे त्यांचे तीन शक्तिशाली गट होते. उत्तरेकडचे उद्योगपती (उजवीकडे), दक्षिणेचे जमीनदार (मध्ये, खिशात आयुड) आणि उत्तरेचे औद्योगिक कामगार (डावीकडे). त्यांच्या बुटाखाली चिरडलेला काळा सैनिक उठण्यासाठी व्यर्थ धडपड करीत आहे. फोर्ट पिलो येथे काळ्या सैनिकांची जी कत्तल करण्यात आली त्याची स्मृती म्हणून दिसणारा बिल्ला दक्षिणी शेतकऱ्याच्या छातीवर.*

## मतदानाचा हक्क

आणि लिंकन एवढ्यावरच थांबला नव्हता. यादवी युद्ध प्रारंभ होण्याच्या काही काळ आधी अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला होता की, कृष्णवर्णीय मुक्त असले तरी अमेरिकन नागरिक नव्हते आणि ते होणेही शक्य नव्हते. पण लिंकनने आणि यादवी युद्धाने हा निर्णय चुकीचा ठरवला होता. आता त्याचे मुख्य उद्दिष्ट कृष्णवर्णीयांना अमेरिकन समाजात पूर्ण अधिकार देण्याचे आणि सार्वजनिक जीवन, शाळा आणि नोकरीधंद्याचे सर्व मार्ग त्यांना खुले करून द्यायचे होते.

समाजात बरोबरीचे स्थान मिळण्याचा एक मार्ग म्हणजे मतदानाचा अधिकार हा होता. युद्धापूर्वी, फक्त तीन उत्तरेकडच्या राज्यांत निवडणुकीच्या वेळी मतदान करण्याचा हक्क कृष्णवर्णीयांना होता. चार वर्षांच्या रक्तपातानंतर पूर्वी गुलामगिरी राबविणाऱ्या दक्षिणेतील लोकांना या योजनेबद्दल काय वाटेल हे अगदी स्पष्ट होते. लिंकनच्या स्वत:च्या पक्षातही खूप लोकांना हा प्रस्ताव मुळीच आवडला नव्हता. तर पक्षातील जहाल मताच्या लोकांनी त्याच्या प्रस्तावाला जोरदार पाठिंबा दिला.

अशा रीतीने लिंकन परस्परविरोधी हितसंबंधांच्या कात्रीत सापडला होता व या समस्येचे उत्तर शोधून काढण्याची धडपड करीत असतानाच तो मारला गेला. पण त्याच्या उत्तराधिकाऱ्यांनी बंडखोर राज्यांना, त्यांना संघराज्यात परत यायचे असेल तर कृष्णवर्णीयांना मतदानाचा अधिकार द्यावलाच पाहिजे अशी अटच घातली. काँग्रेसने १८६९ मध्ये अत्यंत महत्वाची पंधरावी घटना दुरुस्ती केली. या दुरुस्तीत म्हटले होते, 'वंश, वर्ण किंवा पूर्वीचे दास्य या कोठल्याही कारणाने संघराज्य किंवा संघराज्यातले कोठलेही घटक राज्य अमेरिकन नागरिकांना मतदानाच्या हक्कापासून वंचित करू शकणार नाही किंवा त्या हक्कांवर बंधन घालू शकणार नाही.'


अशा रीतीने १८६० चे दशक संपायला आले तोपर्यंत अमेरिकेत गुलामगिरी नष्ट झाली व कायद्याने कृष्णवर्णीयांना गोऱ्यांप्रमाणे सर्व हक्क मिळाले. निदान तसा कायदा तरी झाला. पण सबंध दक्षिणेत हा कायदा बिनदिक्कत धाब्यावर बसविण्यात आला.

कॉन्फेडरसीचा पराभव झाला होता हे खरे आहे. ज्या गुलामांच्या बळावर दक्षिणेची सुबत्ता उभी होती ते आता स्वतंत्र नागरिक होऊन अमेरिकन समाजात पूर्ण समानता प्राप्त झालेले मतदार झाले होते. पण कृष्णवर्णीय आपल्या बरोबरीचे आहेत ही कल्पना जिवात जीव आहे तोपर्यंत गोऱ्या दक्षिणवासीयांना मान्य होणारी नव्हती. आणि लिंकन गेल्यावर थोड्याच महिन्यांत त्यांना स्वत:चे कायदे करून लिंकनच्या कायद्याचे बंधन झुगारून देणे अशक्य नव्हते. दक्षिणेची गुलामांची जुनी आचारसंहिता मुक्तीच्या

*''दुसऱ्या माणसाच्या अनुमतीशिवाय त्याच्यावर राज्य करण्याइतका समर्थ कोठलाही माणूस नसतो.*

*पियोरिया येथे लिंकनने १८५४ मध्ये केलेल्या भाषणामधून.*





*समोर : २८ ऑगस्ट १९६३. मुक्तीनंतर शंभर वर्षांनी लिंकन स्मारकाभोवती जमलेली प्रचंड गर्दी. लिंकनने दिलेल्या वचनाची पूर्ती करा अशी मागणी करण्यासाठी कृष्णवर्णीय अमेरिकनांनी वॉशिंग्टनमध्ये प्रचंड मोर्चा काढला.*

जाहीरनाम्यामुळे नष्ट झाली होती. पण युद्ध संपते न संपते तोच दक्षिणेच्या राज्यांनी काळ्यांना गुलामीत ठेवण्यासाठी नवे नियम करायला सुरुवात केली.

'ब्लॅक कोड्स्' (काळे कायदे) या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या नियमांनुसार पूर्वाश्रमीच्या गुलामांनी अजूनही त्यांना नोकरीवर ठेवणाऱ्या गोऱ्यांना युद्धाच्या आधी म्हणावे लागे तसे 'मास्टर' व 'मिस्ट्रेस' म्हटले पाहिजे असा कटाक्ष होता. दक्षिण कॅरोलिनात ते गुलाम असताना जी कामे करत, म्हणजे शेतमजूर, दाई, स्वयंपाकीण वगैरे, त्याच प्रकारच्या नोकऱ्या करण्याची त्यांना परवानगी होती. मिसिसिपीत त्यांना आगगाडीत गोऱ्यांच्या डब्यातून प्रवास करता येत नव्हता. फ्लॉरिडात त्यांचे चर्च वेगळे होते. एखादा कृष्णवर्णीय गोऱ्यांच्या चर्चमध्ये गेला तर त्याला दक्षिणेकडची परंपरागत शिक्षा मिळे, या प्रमादाबद्दल त्याला चाबकाने फोडून काढण्यात येत असे.

काळ्या गोऱ्यांना वेगवेगळे ठेवण्यासाठी फ्लॉरिडाने जे कायदे केले होते त्या कायद्यांना 'जिम क्रो कायदे' म्हणण्यात येत असे. (१८५० च्या सुमारास लोकप्रिय झालेल्या एका गाण्यात एका काळ्या माणसाचे नाव 'जिम क्रो' होते) उत्तरेच्या लोकांना या कायद्यांबद्दल कळले तेव्हा त्यांना धक्का बसला. संतापून त्यांनी काळ्यांना नागरिकत्व बहाल करणारा कायदा केला.

घटनेची पंधरावी दुरुस्ती संमत झाली तेव्हा काळ्यांनी विजयोत्सव साजरा केला. पण त्यांचा आनंद फार काळ टिकला नाही. दक्षिणेने तो नष्ट केला. दक्षिणेकडे अधिकाधिक 'जिम क्रो' कायदे करण्यात निष्णात असे कायदेपंडित होते. शिवाय दक्षिणेच्या एकसंध समाजात गोऱ्यांच्या एकजुटीला सर्वात अधिक महत्त्व होते. जोडीला दक्षिणेत 'कू क्लक्स क्लॅन' ही संघटना होती. ही तथाकथित गुप्त संघटना दहशतवादाच्या बळावर गोऱ्यांच्या अनिर्बंध वर्चस्वाला उघडउघड पाठिंबा देत होती.

काळ्या लोकांनी आपले कायदेशीर हक्क बजावण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्यावर या बुरखाधारी दहशतवाद्यांची धाड पडण्याची शक्यता असे. त्यांच्या हातात चाबूक, डांबराने भरलेल्या बादल्या, नाहीतर दोरखंड असे. एखाद्याच्या अंगावर डांबर ओतून त्यावर पिसे खोचणे क्रूर होते खरे पण अशी व्यक्ती सुदैवी म्हणायला हवी. ज्याच्या नशिबी दोरखंड असे, त्याचा छळ केला जाऊन शेवटी एखाद्या खांबाला किंवा झाडाला टांगून त्या हतभाग्याला फाशी दिले जात असे.

*''आफ्रिकेला परत जा''*
*१९५० च्या सुमारास अलाबामामधला एक निग्रो-विरोधी फलक.*

*''अमेरिकेतील बहुसंख्य वंचित वर्ग कृष्णवर्णीय आहे.''*
*१९९० साली न्यूयॉर्कमध्ये निर्माण झालेल्या वांशिक तणावावर लंडन टाईम्सने केलेल्या लिखाणातून.*

लिंकनने आणि युद्धाने कृष्णवर्णीयांना जो लाभ प्राप्त करून दिला तो नष्ट होत असलेला ते उघड्या डोळ्यांनी पहात होते. मतदानाचा हक्क, उपजीविकेचा हक्क, राष्ट्राचे स्वाभिमानी घटक म्हणून जगण्याचा हक्क या सगळ्यांचा काय उपयोग होता? त्यांना दूर ठेवायचा, दारिद्र्यात ठेवायचा आणि त्यांच्यावर सदैव



दहशतवादाचा आसूड उगारलेला ठेवायचा असा निश्चय केलेल्या या समाजात या हक्कांना काय किंमत होती?

हताश होऊन पुष्कळसे कृष्णवर्णीय उत्तरेला गेले,. पण तेथेही परिस्थिती जवळजवळ तशीच होती. औद्योगिक संघटना सभासद करून घ्यायला तयार नव्हत्या. त्यांना अगदी किमान वेतनाच्या नोकऱ्या पत्करणे भाग पडे. त्यांना शहराच्या अगदी गलिच्छ वस्तीत रहावे लागे. त्यातून विसाव्या शतकाच्या प्रारंभी कू क्लक्स क्लॅन संघटनाही त्यांच्या मागोमाग आपला भयानक दहशतवाद बरोबर घेऊन उत्तरेला आली. त्यांनी १८८० ते १९१९ या कालखंडात जवळजवळ तीन हजार काळ्यांना समतेची मागणी करण्याचे धाडस दाखविल्याबद्दल फासावर लटकावले होते.

पण परिस्थिती जरी भीषण होती तरी ती बदलत चालली होती. 'नॅशनल असोसिएशन फॉर द ॲडव्हान्स ऑफ कलर्ड पीपल' यांसारख्या कृष्णवर्णीयांच्या सामर्थ्यशाली संघटना उदयाला येऊ लागल्या. कृष्णवर्णीयांना खरेखुरे स्वातंत्र्य प्राप्त करून द्यायचे अशी या संघटनांनी शपथ घेतली होती. कृष्णवर्णीय नेतेही उदयाला येत होते, आणि जसजसे दिवस गेले तसतसे त्यांचे सामर्थ्य व त्यांचा मानसन्मान वाढत गेला.


## ''माझे एक स्वप्न आहे''

दिनांक २८ ऑगस्ट १९६२ या दिवशी लिंकनच्या जाहीरनाम्याला शंभर वर्षे होताना दोन-अडीच लाख अमेरिकन नागरिकांनी आपल्या मुक्ततेची शताब्दी साजरी करण्यासाठी वॉशिंग्टनमध्ये भव्य मिरवणूक काढली. अग्रभागी नागरिक हक्कांचा महान पुरस्कर्ता मार्टिन लूथर किंग होता. ज्या माणसाने त्यांना मुक्त केले त्याच्या स्मारकाजवळ ते सगळे जमले तेव्हा त्याने दिलेल्या वचनाची कितपत पूर्ती झाली आहे हे दर्शविणारे फलक त्यांच्या हाती होते. एका फलकावर लिहिले होते, '१९६३ साली आम्हाला अजून प्रतीक्षा आहे' दुसऱ्यावर लिहिले होते 'शंभर वर्षांपूर्वीचे स्वप्न अजूनही साकार झालेले नाही.'

त्या दिवशी किंगने त्याच्या आयुष्यातले चिरस्मरणीय भाषण केले. गेटिसबर्गच्या भाषणाप्रमाणेच हे भाषण ऐतिहासिक ठरले आहे.

किंग म्हणाला, ''माझे एक स्वप्न आहे... सर्व माणसे जन्मत: समान आहेत या स्वयंप्रकाशित सत्यावर हे राष्ट्र आधारलेले आहे आणि एक दिवस असा उगवेल की हे राष्ट्र या तत्त्वावर खरोखरीच उभे राहील. हे माझे स्वप्न आहे.

''एक दिवस असा येईल की, त्या दिवशी जॉर्जियाच्या तांबड्मातीच्या टेकड्यांवर पूर्वाश्रमीच्या गुलामांची मुले आणि पूर्वाश्रमीच्या मालकांची मुले समानतेच्या नात्याने एकत्र येतील. हे माझे स्वप्न आहे.





*गोऱ्यांशी बरोबरी, पुरुषांची बरोबरी. एकेकाळी सर्वस्वी पुरुषाचा व्यवसाय असलेल्या डॉक्टरी पेशातली ही स्त्री दोन मितिंच्या आघाड्यांवरील विजयाचे प्रतीक आहे. मध्यमवर्गीय अमेरिकन समाजाचा एक कृष्णवर्णीय घटक या नात्याने तिने एक महत्त्वाचे उदाहरण घालून दिले आहे. स्वत:चे आयुष्य स्वत: घडवू पाहणाऱ्या तरुण कृष्णवर्णीय स्त्री व पुरुष दोघांसमोर हा महत्त्वाचा आदर्श आहे. तरीदेखील काळ्या कुळात जन्मल्यामुळे त्यांच्या नशिबी दारिद्र्य आले आहे असे पुष्कळ कृष्णवर्णीय अजूनही त्या दारिद्र्यात खितपत पडण्याची शक्यता आहे.*

"एक दिवस असा येईल की मिसिसिपी राज्यदेखील स्वातंत्र्याचे व न्यायाचे केंद्र होईल, हे माझे स्वप्न आहे.

"एक दिवस असा येईल की, या राष्ट्रात माझी चारी मुले त्यांच्या कातडीच्या रंगाने नव्हे तर त्यांच्या शील आणि चारित्र्याने मापली जातील."

पाच वर्षांच्या आत किंग मारेकऱ्याच्या गोळीला बळी पडला. पण तोपर्यंत त्यांचे स्वप्न वास्तवाच्या आणखी जवळ सरकले होते. चळवळ चालूच राहणार होती. कृष्णवर्णीय लोक वाढत्या संख्येने सार्वजनिक पदांवर निवडून येणार होते. चांगल्या नोकऱ्या, चांगली घरे आणि चांगले जीवनमान यांच्यापासून दूर ठेवणारे अडथळे ओलांडून ते पुढे जाणार होते.

पण तरीही अमेरिकेचे काळे अमेरिकेच्या गोऱ्यांपेक्षा अधिक गरीब राहिले. १९९० साली टेक्सासमध्ये ह्यूस्टन येथे एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद झाली तेव्हाही कू क्लक्स क्लॅनने आपला भीतीदायक पोशाख घालून उघड उघड मिरवणूक काढली. दक्षिणवासीयांनी हे युद्ध आरंभले तेव्हा त्यांचा जो झेंडा होता तोच या मिरवणुकीत फडकत होता.

शंभर वर्षांपूर्वी अब्राहम लिंकनने जे महान कार्य आरंभले ते अद्याप पूर्ण झालेले नाही.



## शब्दकोश

**अमेरिकन यादवी युद्ध :** अमेरिकन संघराज्याच्या दक्षिणेकडील गुलामगिरीची प्रथा मानणारी राज्ये आणि उत्तरेकडील राज्ये यांच्यामध्ये १८६१ साली सुरू झालेले युद्ध. ते युद्ध १८६५ मध्ये संपले. त्यामध्ये दक्षिणेकडील राज्यांचा पराभव झाला. संघर्षाचे मुख्य कारण गुलामगिरीचा प्रश्न हेच होते.

**औद्योगिक क्रांती :** यंत्रांचा वापर करून वस्तूंच्या उत्पादन पद्धतीमध्ये करण्यात आलेला आमूलाग्र बदल. ब्रिटनमध्ये सुरू झालेली ही क्रांती १७८० च्या दशकामध्ये अमेरिकन संघराज्यातही पोहोचली.

**काँग्रेस :** अमेरिकन संघराज्याचे राष्ट्रीय कायदेमंडळ. हे मंडळ सिनेट आणि हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हज अशा दोन भागांमध्ये विभागले आहे.

**कॉन्फेडरेट स्टेट्स् ऑफ अमेरिका:** गुलामगिरीची प्रथा मान्य असणाऱ्या राज्यांनी निर्माण केलेला वेगळा देश. १८६० आणि १८६१ मध्ये ही राज्ये अमेरिकन संघराज्यातून फुटून बाहेर पडली आणि त्यांनी उत्तरेकडील राज्यांशी युद्ध सुरू केले.

**डेमोक्रॅटिक पार्टी :** अमेरिकन संघराज्यातील रिपब्लिकनांच्या विरुद्धचा राजकीय पक्ष. १९ व्या शतकामध्ये अगदी लिंकनची राष्ट्राध्यक्षपदी निवड होईपर्यंत हा पक्ष सत्तेवर होता.

**तेरावी घटना दुरुस्ती :** संघराज्याच्या घटनेमध्ये १८६५ साली केलेली दुरुस्ती. त्यानुसार देशात सर्वत्र गुलामगिरीवर बंदी घालण्यात आली होती.

पुढल्या वर्षीच करण्यात आलेल्या चौदाव्या घटनादुरुस्तीनुसार संघराज्यात जन्मलेल्या वा तेथे राहत असलेल्या सर्व लोकांना नागरिकत्व देण्यात आले.

१८६९ मध्ये करण्यात आलेल्या पंधराव्या घटनादुरुस्तीनुसार संघराज्यातील सर्व नागरिकांना वंश, वर्ण किंवा पूर्वीची गुलामगिरीची अवस्था यांचा विचार न करता मतदानाचा अधिकार देण्यात आला.

**निर्मूलन, निर्मूलनकारी :** १८३० ते अमेरिकन यादवी युद्धामधील काळात, गुलामगिरी संपूर्ण नष्ट करण्यासाठी केलेली चळवळ; त्यात सहभागी होणारे लोक

**मिसुरी कॉम्प्रमाईज :** अमेरिकन संघराज्याने १८२० मध्ये संमत केलेला कायदा. या कायद्यान्वये अमेरिकेच्या उत्तर आणि दक्षिण भागात राज्यांचे समान प्रमाणात वाटप करण्यात आले. तसेच मिसुरी नदीच्या उत्तरेला निर्माण होणाऱ्या नव्या राज्यांना गुलामगिरीची परवानगी दिली जाणार नाही असेही त्यात ठरले.

**रिपब्लिकन पक्ष :** गुलामगिरीच्या अनिष्ट प्रथेविरोधात संघर्ष करण्यासाठी १८५४ मध्ये स्थापन करण्यात आलेला अमेरिकेतील एक राजकीय पक्ष. अब्राहम लिंकन १८५६ मध्ये या पक्षाचा सदस्य झाला आणि १८६० मध्ये तो अमेरिकन संघराज्याचा अध्यक्ष झाला.

**स्वातंत्र्याचा जाहीरनामा :** उत्तर अमेरिकेतील तेरा ब्रिटिश वसाहतींनी १७७६ मध्ये सही केलेला दस्तऐवज. त्यामध्ये त्यांनी त्यांना ब्रिटिश सत्तेपासून स्वातंत्र्य का दिले जावे याची कारणे दिली आहेत.